सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, १६ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३२२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कॅलिफोर्नियाला कोकणासारखे व्हावेसे वाटायला लावणारे काम करू- एकनाथ शिंदे

रत्नागिरी : कोकणाचा कॅलिफोर्निया नव्हे, तर कॅलिफोर्नियाला कोकणासारखे व्हावेसे वाटले पाहिजे, असे काम आपल्याला करायचे आहे, असे प्रतिपादन शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (दि. १५ फेब्रुवारी) रत्नागिरीत केले.

मतदारांनी महायुतीच्या नेत्यांना आमदारपदी निवडून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्री. शिंदे यांची आभार सभा आज येथील चंपक मैदानात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. आपल्या भाषणातून त्यांनी जनतेचे आभार मानले. ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीमध्ये मिळालेल्या विजयामध्ये कोकणी माणसाचा वाटा मोठा आहे. या विजयाने विरोधकांची बोलती बंद केली. खरी शिवसेना कोणाची, बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार कोण, हे जनतेने ठरवले आहे. जनतेने एवढे बहुमत दिल्यामुळे आमची जबाबदारी वाढली आहे. आम्ही आरोपांना आरोपांनी नव्हे, तर कामातून उत्तर देतो. सत्ता येते जाते. पदेसुद्धा वरखाली होत असतात. पण कुठल्याही पदापेक्षा महाराष्ट्रातील माझ्या लाडक्या बहिणींनी मला दिलेली 'महाराष्ट्राचा लाडका भाऊ' ही ओळख माझ्यासाठी खूप मोठी आहे, असे भावनिक उद्गार श्री. शिंदे यांनी काढले. तसेच लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे आश्वासन दिले.

श्री. शिंदे यांनी विकासासाठी सतत कार्यरत राहण्याची ग्वाही दिली, तसेच उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पक्षावर टीकाही केली. ते म्हणाले, बाळासाहेबांनी कोकणावर प्रेम केले आणि कोकणी माणसाने बाळासाहेबांवर, शिवसेनेवर, धनुष्यबाणावर प्रेम केले. मिळालेला विजय बाळासाहेबांच्या चरणी अर्पण करायला मी आलो आहे. आम्ही खोटी आश्वासने देत नाही. पूर्ण विचार करूनच योजना सुरू केल्या आहेत. महाराष्ट्राला गतिमानतेकडे, विकासाकडे नेण्याचे काम आम्ही केले. शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत महाराष्ट्राच्या विकासासाठी काम करीन. आमच्या पक्षात सगळे कार्यकर्ते आहेत, कुणी मालक-नोकर नाही. आम्ही सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलो नाही, तर सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये सोन्याचे दिवस आणण्यासाठी आमचा जन्म झालेला आहे. आम्ही आरोपांना कामातून उत्तर देणार आहोत. मला शिव्या देण्यापेक्षा लोक तुम्हाला का सोडतायत, याचे आत्मपरीक्षण करा, असा सल्ला शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना दिला.रामदास कदम यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. मी किंवा एकनाथ शिंदे यांनी तोंड उघडले, तर उद्धव ठाकरे यांना देश सोडून जावे लागेल.

एकनाथ शिंदेंनी खोके दिले, अशी टीका केली जाते; पण शिंदेंनी खोके दिले ते विकासकामांसाठी दिले आणि त्यांनी सांगितल्यानुसार ४० आमदारांपैकी एकही आमदार पडू दिला नाही. ठाकरे यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे.जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेनेचा भगवा ध्वज फडकेल, असा विश्वास यावेळी उदय सामंत यांनी व्यक्त केला. लाडकी बहीण योजनेसह सरकारने सुरू केलेली कोणतीही योजना बंद पडणार नाही, अशी ग्वाहीदेखील सामंत यांनी दिली. विधानसभा निवडणुकीत महायुतीने मिळवलेल्या महाविजयाचे खरेखुरे शिल्पकार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच आहेत आणि हे कुणीच नाकारू शकत नाही, असे प्रतिपादन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी केले.

# केजरीवालांच्या बंगल्याच्या खर्चाची चौकशी करा

## केंद्रीय दक्षता आयोगाने दिले केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाला आदेश



नवी दिल्ली : दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या ६ फ्लॅग स्टाफ रोड येथील शीशमहल या सरकारी बंगल्याच्या नूतनीकरणासाठी कोट्यवधी रुपये खर्च झाले होते. आम आदमी पक्षाच्या कार्यकाळात हा खर्च करण्यात आला होता. आता या खर्चाची सखोल चौकशी करण्यात यावी असे आदेश केंद्रीय दक्षता आयोगाने (सीव्हीसी) केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाला (सीपीडब्ल्यूडी) दिले आहेत.

दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान शीशमहल हे ४० हजार चौरस यार्डांहून (८ एकर) अधिक जागेवर आहे. या बंगल्याच्या नूतनीकरणाचे आदेश केजरीवालांनी दिले होते.

मात्र नूतनीकरण करताना बांधकाम नियमांचे उल्लंघन झाल्याची तक्रार १४ ऑक्टोबर २०२४ रोजी विजेंदर गुप्ता यांनी सीव्हीसीकडे दाखल केली होती.

विजेंदर गुप्ता यांनी आरोप केला होता की, केजरीवाल यांनी ४० हजार चौरस यार्ड (८ एकर) मध्ये पसरलेली ही भव्य इमारत बांधण्यासाठी इमारत नियमांचे उल्लंघन केले. राजपूर रोडवरील प्लॉट क्रमांक ४५ आणि ४७ (पूर्वीचे टाइप-व्ही फ्लॅट्स ज्यात वरिष्ठ अधिकारी आणि न्यायाधीश राहत होते) आणि दोन बंगले (८-अ आणि ८-ब, फ्लॅग स्टाफ रोड) यासह सरकारी मालमत्ता पाडून त्याचे नवीन घरांमध्ये विलीन करण्यात आल्या.

यामध्ये ग्राउंड कव्हरेज आणि फ्लोअर एरिया रेशो (एफएआर) नियमांचे उल्लंघन करण्यात आले. तसेच योग्य लेआउट प्लॅनचा अभाव आहे.

सीव्हीसीने ५ नोव्हेंबर २०२४ रोजी गुप्ता यांच्या तक्रारीची दखल घेतली आणि आरोपांचे गांभीर्य मान्य केले. त्यानंतर, ५ डिसेंबर रोजी, सीपीडब्ल्यूडीच्या मुख्य दक्षता अधिकाऱ्यांनी (सीव्हीओ) विजेंद्र गुप्ता यांच्या तक्रारीवर आधारित तथ्यात्मक अहवाल सीव्हीसीला सादर केला होता.

# ज्येष्ठांच्या आयुष्यात आनंद फुलविण्याचा उद्देश: नितीन गडकरी

## खासदार ज्येष्ठ नागरिक सांस्कृतिक महोत्सवाचा थाटात शुभारंभ

नागपूर, १५ फेब्रुवारी : ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्य अधिकाधिक आनंदी करण्याचा, त्यांच्या आयुष्यात सकारात्मकता यावी, त्यांचे आयुष्य सुखकर व्हावे, प्रसन्न मनाने त्यांना सामाजिक कार्यात योगदान देता यावे, या उद्देशाने दरवर्षी विविध शिबिरांसह खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जाते. त्याला मिळत असलेला प्रतिसाद पाहून महोत्सवामागचा उद्देश सफल होत असल्याचे दिसते आहे, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. नितीन गडकरी यांची संकल्पना असलेल्या खासदार ज्येष्ठ नागरिक सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन शनिवारी सुरेश भट सभागृहात झाले. त्यावेळी ते बोलत होते.

प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र यांच्या हस्ते या सोहळ्याचे थाटात उद्घाटन झाले. मंचावर ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष दत्ता मेघे, पद्मश्री डॉ. विलास डांगरे, डॉ. संजय उगेमुगे, अशोक मानकर, हाजी शकील सैफी, प्रतापसिंग चव्हाण यांची उपस्थिती होती. ज्येष्ठ नागरिकांना सहलीचा आनंद घेता यावा यासाठी आणखी ४ इलेक्ट्रिक बसेसची व्यवस्था करण्यात आली असल्याचे सांगत नितीन गडकरी यांनी कमाल चौकात अल्पदरात सर्व वैद्यकीय चाचण्या व सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती दिली. वर्धा रोडवर सात मजली इमारत आकाराला येत असून, त्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी निःशुल्क सभागृह व ऑरगॅनिक फ्रुट बाजार राहील, असे ते म्हणाले. ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानतर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध शिबिरांसह, पुर्णब्रम्ह अन्नदान योजना आदींची माहिती त्यांनी दिली. नितीनजींसारख्या अभ्यासू, काळजीवाहू नेत्यामागे खंबीरपणे उभे राहून, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानला सहकार्य करावे, असे आवाहन दत्ता मेघे यांनी यावेळी केले.

# शिवनेरी जुन्नर येथे १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान रंगणार 'शिवजन्मोत्सव'

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'हिंदवी स्वराज्य महोत्सव २०२५'चे उद्घाटन : शंभूराज देसाई

मुंबई : छत्रपती शिवरायांच्या ३९५ व्या जयंती निमित्त महाराष्ट्र राज्य पर्यटन विभाग,पर्यटन संचालनालय व पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील शिवनेरी किल्ल्यावर, शंकरराव बुट्टे-पाटील विद्यालय मैदानाच्या प्रांगणात दि. १७ ते १९ दरम्यान 'हिंदवी स्वराज्य महोत्सव २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे.१७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता या सोहळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १९ फेब्रुवारी रोजी त्यांच्या जयंतीनिमित्त १७ ते १९ फेब्रुवारीपर्यंत महाराष्ट्राची संस्कृती, कला, लोककला, सभ्यता आणि परंपरा दाखवणाऱ्या विविध कार्यक्रमांचा समावेश असलेल्या 'शिवजन्मोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्हा पालकमंत्री अजित पवार , सहकार आणि नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ ,उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, इंद्रनील नाईक, राज्यसभा सदस्य मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, लोकसभा सदस्य सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, पुणे जिल्ह्यातील सर्व विधानपरिषद विधानसमा सदस्य आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महोत्सवातंर्गत दि.१७ फेब्रुवारी सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत राज्यातील महिला बचतगटांच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी विविध बचतगटांची उत्पादने व खाद्य पदार्थाच्या स्टॉलचे प्रदर्शन लावण्यात येणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ६ पर्यंत महाराष्ट्राच्या जिद्दीचे प्रतीक असलेली शिवनेर महोत्सव बैलगाडा शर्यत घेण्यात येणार असून मराठी मातीतील भव्य कबड्डी स्पर्धा सकाळी ११ वाजता असणार आहे. रात्रौ. ८ वाजता शिवस्पर्श शिवसह्याद्री सरसेनापती उमाबाई दाभाडे प्रतिष्ठान च्या वतीने (शिवसह्याद्री ऐतिहासिक महानाटयाचा) प्रयोग सादर करण्यात येणार आहे.

दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते रात्रौ ९ पर्यंत विविध बचतगटांची उत्पादने व खाद्य पदार्थाच्या स्टॉलचे प्रदर्शन असणार आहे तर स्वरांजली कलामंच, पुणे निर्मित(गौरव माझ्या महाराष्ट्राचा) हा सांस्कृतिक कार्यक्रम रात्रौ ८ वाजता सादर करण्यात येणार आहे. तसेच शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर रात्री १२ वाजता छत्रपती शिवरायांना मानवंदना देण्यात येणार आहे.

दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ४ पर्यंत जुन्नर तालुक्यातील गुणवंत कलाकार शिवकालीन खेळांची प्रात्यक्षिके सादर करतील. सायंकाळी ५ वाजता छत्रपती शिवरायांची महाआरती व सायंकाळी ६ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध पार्श्वगायिका वैशाली सामंत यांचा संगीत रजनी कार्यक्रम होणार आहे.

दि. १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान हा शिवजन्मोत्सव जुन्नर येथील शंकरराव बुट्टे-पाटील विद्यालय मैदानाच्या प्रांगणात पार पडणार असून महाराष्ट्रातील तमाम नागरिक आणि शिवप्रेमींनी या महोत्सवाला आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पर्यटन संचालक डॉ.बी.एन. पाटील यांनी केले आहे.

# मोहन भागवत यांची बंगालमध्ये सभा होणारच!



नवी दिल्ली : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला कोलकाता उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. संघाला पश्चिम बंगालमधील वर्धमान येथे रॅली काढण्याची न्यायालयाकडून परवानगी मिळाली आहे. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी आरएसएसची रॅली होणार आहे. यापूर्वी पश्चिम बंगाल पोलिसांनी या रॅलीला परवानगी नाकारली होती. पण, आता या रॅलीसाठी परवानगी मिळाली असून, हा मुख्यमंत्री ममता बॅनर्जींना मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे.

कोलकाता उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी बंगाल सरकारचा आक्षेप फेटाळून लावत आरएसएसच्या रॅलीला सशर्त परवानगी दिली आहे. या रॅलीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत देखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

बंगाल पोलिसांनी असे सांगून परवानगी नाकारली होती की, सध्या बंगाल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशनद्वारे घेण्यात येणारी दहावीची परीक्षा सुरू आहे आणि त्यामुळे लाऊडस्पीकरच्या वापरावर बंदी आहे. पण, रॅली शांततेत काढण्यात यावी आणि आवाज कमी ठेवावा, असे कोलकाता उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

आरएसएसची रॅली रविवारी होणार असून हा कार्यक्रम फक्त १ तास १५ मिनिटे चालणार आहे, त्यामुळे कोणाचीही गैरसोय होईल असे न्यायालयाला वाटत नाही, असे न्यायाधीशांनी सांगितले. रॅली शांततेत पार पाडून आवाज कमी ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. येथील रॅलीनंतर मोहन भागवत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रादेशिक नेते, स्थानिक कार्यकर्ते आणि वर्धमान आणि आसपासच्या भागातील प्रमुख लोकांचीही भेट घेणार आहेत. आरएसएसचे सरचिटणीस जिष्णू बसू म्हणाले की, मोहन भागवत यांच्या दौऱ्याचा उद्देश हिंदू समुदायामध्ये राष्ट्रवादाची भावना वाढवणे, स्वदेशी चेतनेला प्रोत्साहन देणे आणि स्वावलंबी भारताची संकल्पना पुढे नेणे हा आहे.

# महाकुंभाला जाणाऱ्या भाविकांच्या गाडीचा अपघात! १० जणांचा मृत्यू, १९ गंभीर



प्रयागराज : काही दिवसांपूर्वीच प्रयागराजमध्ये सुरु असणाऱ्या महाकुंभमेळ्याहून परतणाऱ्या भाविकांच्या गाडीचा भीषण अपघात झाला होता. त्यानंतर अशीच घटना घडल्याचे पुन्हा घडल्याचे समोर आले आहे. महाकुंभमेळ्याला जाणाऱ्या भाविकांच्या वाहनाचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये १० जणांचा जागेवरच मृत्यू झाला असून १९ जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रयागराज मिर्जापूर हायवेवर मेजा परिसरात शुक्रवारी मध्यरात्री बोलेरो आणि बस यांची समोरासमोर धडक झाली. या भीषण अपघतामध्ये दहा भाविकांचा मृत्यू झाला. जखमींपैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस प्रशासन दाखल झाले असून पुढील तपास सुरु आहे. तसेच मृतदेह ताब्यात घेऊन ओळख पटवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र प्रयागराजमध्ये सातत्याने घडणाऱ्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# केसरी टूर्सचे संस्थापक-अध्यक्ष केसरी भाऊ पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन

## १९ फेब्रुवारी रोजी शोकसभा



मुंबई : केसरी टूर्सचे संस्थापक-अध्यक्ष केसरी भाऊ पाटील यांचे १५ फेब्रुवारी रोजी शनिवारी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी संध्याकाळी चार ते सहा या वेळेत बांद्रे येथील त्यांच्या निवासस्थानी व्यवस्था करण्यात आली होती. शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचं संपूर्ण कुटुंबिय आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९ फेब्रुवारी रोजी दादर पूर्व येथील योगी सभागृह हॉल येथे दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत शोकसभेचे आयोजन केले आहे.

वयाच्या नव्वदीतही केसरी भाऊंनी श्रीनगर ते दूधपात्री असा प्रवास केला. वय हा फक्त एक आकडा आहे. काळानुरूप तो वाढतो. पण आपल्या जिद्दीचा झरा चिरंतन वाहत राहिला पाहिजे...असा संदेश जणू त्यांनी दिला. केसरी भाऊ...एक प्रसन्न, हासरं आणि भारदस्त व्यक्तिमत्त्व. जिथे जाईल तिथे सर्वांना आपलसं करणारं. त्यांच्यामध्ये जितकी शिस्तबद्धता होती तितकाच प्रेमळ आणि मिश्किल स्वभावही होता. एक आदर्श शिक्षक, प्रयोगशील शेतकरी ते लोकप्रिय सहल संयोजक अशी त्यांची ओळख. गावाकडच्या वातावरणातून मुंबईसारख्या स्वप्ननगरीत येऊन सहकुटुंब, मुलांसोबत ते राहिले. ज्या वयात माणसं निवृत्त होतात त्या ५०व्या वयात भाऊंनी ८ जून १९८४साली केसरी टूर्सची स्थापना केली. २४ तास कार्यरत राहत, कोणतेही सणवार न पाहता ते कार्यशील असायचे. या प्रवासात त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सुनिता पाटील कायम सोबत होत्या. तसंच हे सारं काही त्यांनी पुढच्या पिढीलाही शिकवलं. अविरत कष्ट, परिश्रम आणि अभिनव संकल्पनांद्वारे पर्यटन क्षेत्रात नवनवीन क्षितिजे पार करत केसरी टूर्सने पर्यटन क्षेत्रात यशस्वी ४० वर्षे पूर्ण केली आहेत. ज्या काळात पर्यटनाची संकल्पना फार

# नांदेडातील गोळीबार घटनेतील दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ फेब्रुवारी**

शहरातील शहिदपुरा भागात दि. १० फेब्रुवारी रोजी गोळीबाराची घटना घडली होती. या घटनेत एक जणाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाला होता. या घटनेतील दोन आरोपींना नांदेड पोलिसांनी दि. १३ फेब्रुवारी रोजी अटक केली आहे.

शहरातील वजिराबाद पोलिस ठाण्यच्या हद्दीत दि. १० फेब्रुवारी रोजी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला व रजेवर आलेला आरोपी गुरमीतसिंघ राजासिंघ सेवादार व त्याचा नातेवाईक रविंद्रसिंघ दयालसिंघ राठोड हे स्कूटीवरून जात असताना त्यांच्यावर एका मोटारसाइकल स्वराने गोळ्या झाडल्या. यात दोघेही जखमी झाल्याने त्यांना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले असता गुरमीतसिंघ सेवादार याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात जिल्हा पोलीस दलाने शहर व परिसरातील सर्व लॉज, घटनास्थळा शेजारील सिसिटीवी फुटेज, अभिलेखावरील आरोपी याची तपासणी करून विविध पथके तैणात करण्यात आली.

यात सर्व बाबींचे विश्लेषन करून गुन्हा उघड करत आरोपी मनप्रितसिंघ उर्फ मन्नु गुरूबक्षसिंघ ढिल्लो व हरप्रितसिंघ उर्फ हॅप्पी बाबुसिंघ कारपेंटर या दोघांना दि. १३ फेब्रुवारी रोजी अटक केली.

आरोपीकडून गुन्ह्यात वापरेलेली वाहने, मोबाईल जप्त करण्यात आली आहे. या गुन्ह्यात महाराष्ट्राबाहेरील आरोपी समाविष्ठ असल्याने हा गुन्हा दहशतवाद विरोधी पथकाकडे वर्ग करण्यात आला असल्याची माहिती पोलीसांनी दिली.

# १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे प्रकाशन

## बोधचिन्हातून सांस्कृतिक बहुविविधतेचे प्रतिबिंब : डॉ. मुस्तजिब खान

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

विद्रोही साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हातून भारतीय बहुसांस्कृतिक बहुविविधतेचे प्रतिबिंब आहे. यातून बुध्दाची करूणा आणि परिघाबाहेर ढकलल्यांच्या वेदनेचा विद्रोह प्रतित होतो, असे प्रतिपादन विचारवंत डॉ. मुस्तजिब खान यांनी सुभेदारी विश्रामगृहात शनिवारी, १५ रोजी १९ व्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाच्या प्रकाशन समारंभात केले.

१९ वे, अ.भा. विद्रोही मराठी साहित्य संमेलन बोधचिन्हाचे प्रकाशन अभ्यासक विचारवंत प्रा. मुस्तजिब खान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, चित्रकार राजानंद सुरडकर यांनी रेखाटलेल्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हातून सांस्कृतिक क्रांती घडवली आहे. अजिंठ्याच्या पद्मपाणी बुध्दाच्या हातात पिंपळ पाना ऐवजी लेखणीची मशाल दिली आहे. सोबतच या शहराची ठळक ऐतिहासिक ओळख असलेल्या बिबि का मकबर्याचा मिनारही दर्शवला आहे. संविधानाची मोडतोड सुरु आहे.या जळत्या वास्तवालाही या बोधचिन्हातून दर्शवले आहे. या वेळी प्रास्ताविक विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे राज्य कार्यकारी संघटक किशोर ढमाले यांनी केले. ते म्हणाले की, प्रख्यात चित्रकार राजानंद सुरडकर यांनी विद्रोही साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हासह ईतरही साहित्य संमेलनाचे बोधचिन्ह रेखाटले आहे.या बोधचिन्हातून विद्रोहाचा वारसा अधिक प्रखरपणे पुढे आणला आहे.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सूर्यकांता गंगाधरजी गाडे,संजय जाधव, संमेलन स्वागताध्यक्ष सतीष चकोर, चित्रकार राजानंद सुरडकर, मुख्य निमंत्रक ड.धनंजय बोरडे, अनिलकुमार बस्ते,के.ई.हरिदास, प्रा. भारत सिरसाठ, धोंडोपंत मानवतकर, कार्याध्यक्ष खालिद अहमद, सुधाकर निसर्ग, भीमराव गाडेकर, सविता अभ्यंकर, राष्ट्रपाल वानखेडे,अनिल वानखेडे,वजिर शेख,कवि सुनील उबाळे,आदिंसह मोठ्या संख्येने विद्रोही संमेलनाचे संयोजन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.आभार अनंत भवरे यांनी मानले.

### स्वयंदीप होण्याची प्रेरणा

**१९ वे विद्रोही साहित्य संमेलनाचे बोधचिन्ह प्रसिद्ध चित्रकार राजानंद सुरडकर यांनी रेखाटले आहे. हे संमेलन भारतीय संविधानाला समर्पित आहे. संविधानाने प्रत्येक माणसाला समान लेखून समता, न्याय, बंधूता, मैत्री, वैज्ञानिक दृष्टिकोन ही मूल्ये दिली आहेत. संमेलन बोधचिन्हात भारतीय संविधानाच्या पार्श्वभूमीवर जगाला स्तब्ध करून टाकणाऱ्या अजिंठा लेणीतील पद्मपाणी बुध्दाचा अनुकंपेचा हात आहे. या हातात कालानुरूप 'स्वयं दीप हो' या वचनाला अधोरेखित करणारी लेखणीची मशाल दाखवली आहे. ही लेखणीची मशाल एकाच वेळी 'स्वयंदीप' होण्यासाठी व प्रज्ञेने सर्वंकष अंधार जाळण्याची प्रेरणा आहे. गुलामीच्या तुटलेल्या श्रृंखला बीबी का मकबऱ्याचा एक मिनार दर्शवला आहे.**

**राजानंद सुरडकर यांनी आजपर्यंत विविध साहित्य संमेलनाचे बोधचिन्ह केले आहेत. विविध नियत कालिकात रेखाटने केलेली आहेत. विविध शहरांत चित्र प्रदर्शन केलेली आहेत. विद्रोही सांस्कृतिक चळवळीशी बांधिलकी असलेले आहेत.**

# मराठी पत्रकारांच्या साहित्याचा ठसा दिल्लीत उमटणार

मुंबई : साहित्याचा ठसा आता दिल्लीत उमटणार आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सदस्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन मुंबई मराठी पत्रकार संघाने दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनस्थळी आयोजित केले आहे.

संमेलनाची आमंत्रक संस्था सरहद आणि संस्थेचे प्रमुख संजय नाहर यांनी या आयोजनासाठी सहकार्याचा हात पुढे केला आहे. दिल्लीत तालकटोरा स्टेडियम येथे २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत संपन्न होणाऱ्या साहित्य संमेलनात पत्रकार संघाचा स्टॉल साहित्यप्रेमींचे लक्ष वेधून घेणार आहे. पत्रकार संघाचे सदस्य असलेल्या पत्रकारांनी लिहिलेले प्रत्येकी एक पुस्तक या स्टॉलवर असावे, असे आयोजन करण्यात येत आहे. या स्टॉलची जबाबदारी पत्रकार संघाचे अंतर्गत हिशोब तपासनीस प्रा. हेमंत सामंत आणि सदस्य राजेंद्र साळस्कर सांभाळणार आहेत. या प्रदर्शनात मांडण्यासाठी सदस्यांनी स्वलिखित पुस्तकांपैकी कुठल्याही एकाच पुस्तकाची प्रत' १६ फेब्रुवारीपर्यंत मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयात आणून द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## इमारतीचे बांधकाम पुर्ण; रूग्णालय बनले शोभेची वस्तू

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ फेब्रुवारी -**

तालुक्यातील काक्रंबा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र चालू करण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना शिवसेना (उद्धव ठाकरे गट) सोशल मीडियाचे तालुकाप्रमुख चेतन बंडगर यांनी दि.१४ फेब्रुवारी शुक्रवार रोजी दिले आहे.



काक्रंबा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असून सुध्दा रुग्णांच्या सेवेसाठी अद्याप चालू करण्यात न आल्यामुळे त्या भागातील रुग्णांची गैरसोय होत आहे.

त्यामुळे सदरील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तात्काळ चालू करुन देण्याची मागणी सदरील निवेदनातून केली आहे यावेळी राम थोरात रोहिदास म्हेत्रे यांची उपस्थिती होती.



## संक्षिप्त वृत्त...



### अनुराग जगताप यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.१५ फेब्रुवारी -**

पुरंदर सासवडचे माजी आमदार संजय जगताप यांचे पुतणे अनुराग जगताप यांनी सहकुटूंब सह परिवारांनी आई तुळजाभवानीची विधिवत पूजा केली. पूजेनंतर मंदिर प्रशासकीय कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी, पुजारी शुभम क्षीरसागर, दिनेश कापसे, प्रविण जाधव, रिटायर फौजी प्रतिक गायकवाड हे उपस्थित होते.



### सायबर सुरक्षाबाबत मार्गदर्शन शिबिर संपन्न

**लोहारा, दि.१५ फेब्रुवारी -**

लोहारा तालुक्यातील भातागळी येथील जिल्हा परिषद या शाळेमध्ये एसपीसी योजना अंतर्गत पोलिस अधिक्षक संजय जाधव व अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांचे मार्गदर्शना खाली शालेय विद्यार्थ्यांना या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळामध्ये विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. महाराष्ट्र पोलिस दल, ई-सुरक्षेचा परिचय आणि विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा या विषयांवर ईकबाल सय्यद पोलिस उपनिरीक्षक यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, गुड टच बॅड टचचे प्रशिक्षण पो. नाईक आतीश सारफळे यांनी दिले. शाळेचे एसपीसी नोडल मुख्याध्यापक गायकवाड व शिक्षक वृंद तसेच सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक रवि जगताप सह आदी उपस्थित होते.

### जाणीव संघटनेच्या वतीने बाल मेळावे

**वाशी, दि.१५ फेब्रुवारी -**

सरमकुंडी, तांदळवाडी जाणीव संघटनेचे बाल मेळावे जाणीव संघटनेच्या वतीने वाशी तालुक्यातील सरमकुंडी, तांदळवाडी या ठिकाणी बाल आनंद मेळावे घेण्यात आले. यामधून २५० ते ३०० मुलांपर्यंत हा कार्यक्रम राबवण्यात आला. यामध्ये विविध स्पर्धा खेळ, गाणी गोष्टी, संवाद कौशल्य, वक्तृत्व कौशल्य, नेतृत्व कौशल्य यावर मार्गदर्शन करण्यात आले. मुला-मुलींमध्ये विज्ञानाचा प्रसार व्हावा त्यांचे गुणवत्ता वाढावी तसेच त्यांना व्यक्तिमत्व विकास वाढीसाठी खेळ गाणी गोष्टीतून मार्गदर्शन रामभाऊ लगाडे वंचित विकास संस्थेची पूर्णवेळ कार्यकर्ते यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक सुरवसे, रमेश दुनधव, शिंदे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी मुला-मुलांनी मनापासून आनंद व्यक्त केला व मनसोक्त कार्यक्रमात भाग घेतला.

### तुळजापूरसह उमरगा, लोहारा तालुक्यातील दहा हजार हेक्टर क्षेत्र येणार सिंचनाखाली...

# रामदाऱ्यातील कृष्णेच्या पाणी वितरणाची कामे हाती घ्या

### जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या मागणीवरून आदेश...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ फेब्रुवारी -**

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प उपसा सिंचन योजना क्रमांक २ चे एकूण सहा टप्पे आहेत. त्यातील टप्पा क्रमांक १ ते ५ घाटणे बॅरेज ते रामदरा तलाव ही कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, उमरगा व लोहारा या तीन तालुक्यांना मोठा लाभ होणार आहे. या तीन तालुक्यातील एकूण १०८६२ हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. टप्पा क्रमांक ६ मधील कामांना प्राधान्यक्रमात मंजुरी देण्यात यावी आणि ही कामे तातडीने सुरू कारवी अशी आग्रही मागणी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केली होती. त्याला जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी हिरवा कंदील दिला असून मागणी केलेली टप्पा क्र. ६ मधील कामांच्या सर्वेक्षण, संकल्पन व अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्याबाबत त्यांनी बुधवारी आदेशीत केले आहे.

त्यामुळे रामदरा ते बोरी-एकुरगा या टप्पा क्र.६ मधील पाणी वितरणाच्या कामाला आता वेग येणार असल्याची माहिती आ. पाटील यांनी दिली.

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा कृष्णा खोरे व गोदावरी खोरे विकास महामंडळाचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बुधवार १२ फेब्रुवारी रोजी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या आग्रही मागणीवरून आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. कृष्णा खोर्यात मराठवाड्याचा ९ टक्के भूभाग आहे. त्यामुळे कृष्णा खोर्यातील पाण्यावर मराठवाड्याचा न्याय्य हक्क आहे.

माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी कृष्णा खोर्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळावे यासाठी २००१ साली मंत्रिमंडळात महत्वपूर्ण निर्णयाला मंजुरी मिळवून घेतली.

हक्काच्या २३.६६ टीएमसी पाण्यापैकी ७ टीएमसी पाण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी महायुती सरकारने ११ हजार ७२६ कोटी रूपयांच्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सिंदफळ येथील पंपगृहातून तुळजाभवानी देवीच्या चरणी असलेल्या रामदरा तलावात लवकरच दाखल होत आहे. रामदरा येथून हे पाणी बोरी-एकुरगा आणि तेथून बंद पाईपलाईनद्वारे तुळजापूर, लोहारा आणि उमरगा तालुक्यातील शेतशिवारात जाणार असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

पाणी वितरणाच्या सर्वेक्षणाचे प्राथमिक काम पूर्ण झाले होते मात्र टप्पा क्रमांक ६ मधील प्राधान्यक्रम मंजूर नसल्याने प्रत्यक्षात अंदाजपत्रकाच्या कामांना सुरुवात करता येत नव्हती.

जलसंपदा मंत्री ना. विखे पाटील यांनी आपल्या आग्रही मागणीची दखल घेऊन टप्पा क्रमांक ६ मधील कामांची कार्यवाही सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

योजनेच्या टप्पा क्र.६ मध्ये अस्तित्वात असलेल्या एकूण ८ साठवण तलाव व नव्याने बांधकाम करण्यात आलेले २ बंधारे जोड कालव्याद्वारे भरणे प्रस्तावित आहे.

याद्वारे तुळजापूर तालुक्यातील २,८७४ हेक्टर, उमरगा तालुक्यातील २,०५७ हेक्टर व लोहारा तालुक्यातील २,१४७ हेक्टर असे एकूण ७,०७८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. टप्पा क्र.६ मध्ये निर्माण होणारे ७,०७८ हेक्टर सिंचन क्षेत्र हे उपसा सिंचन योजना क्र.२ च्या एकूण प्रकल्पिय १०,८६२ हेक्टर सिंचन क्षेत्राच्या ६५ टक्के इतके आहे. या टप्प्यात १ पंपगृह, उर्ध्वगामी नलिका व ८५ किलोमीटर लांबीच्या बंद पाईपलाईन कामाचा समावेश आहे. शाश्वत सिंचनामुळे आता कायम पाणी उपलब्ध होणार आहे.

त्यामुळे परिसरातील शेतकरी बांधवांच्या दरडोई उत्पन्नात लक्षवेधी वाढ होवून जीवनमान उंचवण्यास मदत होणार असल्याचा विश्वास आ. पाटील यांनी व्यक्त केला आहे.

#### असे होणार पाण्याचे वितरण...

सिंदफळ येथील पंपगृहातून रामदरा तलावापर्यंतचा पाचवा टप्पा जवळपास पूर्ण झाला आहे. पुढील पाणी वितरणाच्या सहाव्या टप्प्यात तुळजापूर, लोहारा आणि उमरगा या तीन तालुक्यांतील साधारणतः सात हजार ५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. त्यासाठी साधारणपणे ८५ किलोमीटर लांबीची पाईपलाईन अंथरण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रामदरा येथील पंपगृहातून उपसा सिंचन पध्दतीने पाणी उचलून बोरी-एकुरगा गावापर्यंत रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला नेले जाणार आहे. तेथून गुरुत्वाकर्षणाच्या माध्यमातून तुळजापूरसह लोहारा आणि उमरगा तालुक्यात पाईपलाईनद्वारे हे पाणी वाटेत येणाऱ्या आठ तलाव आणि दोन बॅरेजेसमध्ये भरून घेतले जाणार आहे. परिणामी खर्चही कमी लागणार आहे. पुढे ते बंद पाईपलाईनद्वारे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी देण्याचे प्रस्तवित आहे. त्यामुळे सिंचन क्षमतेत ४० टक्क्यांनी वाढ अपेक्षित आहे. या दहा स्टोरेज टँकची एकूण क्षमता दोन टीएमसीपेक्षा अधिक असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

## श्री सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ फेब्रुवारी -**

सदगुरू श्री सेवालाल महाराज यांची २८६ वी सामुदायिक भव्य जयंती महोत्सव नळदुर्ग शहरात शनिवार दि.१५ फेब्रुवारी रोजी विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात येणार आहे.

शनिवारी रोजी सकाळी ११ वाजता कै.वसंतराव नाईक (महामार्ग गोलाई) चौकात श्री सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर हजेरी लावणार आहेत.यावेळी ध्वजारोहण करुन प्रतिमेचे पुजन, भोगचा कार्यक्रम होईल. त्यानंतर शहरातील ऐतिहासिक किल्ला गेट येथुन बसस्थानक पर्यंत रॅली काढण्यात येणार आहे. त्यानंतर उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती नळदुर्ग येथील सदगुरु श्री सेवालाल महाराज जयंती महोत्सव समितीने दिली असुन या कार्यक्रमास समाज बांधवानी उपस्थित राहुन लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जयंती महोत्सव कार्यक्रमासाठी सदगुरू श्री संत सेवालाल महाराज जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष रवि महाराज राठोड, उपाध्यक्ष महेश चव्हाण, अकाश जाधव, सचिव बालाजी राठोड, सहसचिव सचिन राठोड, कोषाध्यक्ष दत्ता राठोड, सहकोषाध्यक्ष प्रभाकर जाधव, मिरवणूक प्रमुख कैलास चव्हाण, सचिन पवार, दिलीप राठोड, प्रवीण चव्हाण आदीनी पुढाकार घेत आहेत.

## भोत्रा सज्जाचे तलाठी गायब; नागरिकांची कामे खोळंबली

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ फेब्रुवारी -**

परंडा तालुक्यातील भोत्रा तलाठी सज्जाचे तलाठी एम.एल. कांबळे हे गेल्या एक महिन्या गावाकडे फिरकत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची काम ठप्प झाली आहेत.

यांच्यावर कारवाई करण्यात यावी. या मागणीचे निवेदन परंडा तहसीलदार यांना शुक्रवार (दि.१४ ) रिपाईचे प्रदेश चिटणीस संजयकुमार बनसोडे यांनी दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, भोत्रासाठी नियुक्त ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी एम.एल. कांबळे महिन्यापासुन सज्जावर आलेच नाहीत. भोत्रा गावामध्ये येतच नाहीत. आपली कामे बाहेरुन करत आहेत. त्यांना फोन केला असता त्यांचा मोबाइल बंद असतो. तलाठी हे ग्रामीण स्तरावरील नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे पद आहे जनतेस आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी तलाठी कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. तसेच, शेतकऱ्यांशी निगडीत ई-पीक पाहणी, नुकसानीचे पंचनामे, दुष्काळ, अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती, पुनर्वसन आदी कामे करण्यासाठी तलाठी महत्त्वाचा दुवा आहे.



कांबळे यांची दप्तर तपासणी करून त्यांना तात्काळ निलंबीत करावे व भोत्रा गावातील लोकांचा त्रास दुर करावा. सदर निवेदनाची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल.

निवेदनावर रिपाईचे प्रदेश चिटणीस संजयकुमार बनसोडे, तालुकाध्यक्ष उत्तम ओव्हाळ, सोशल मीडिया आयटी सेल जिल्हाध्यक्ष आकाश बनसोडे, तालुका संपर्कप्रमुख दादासाहेब सरवदे, विलास भोसले, ता. उपाध्यक्ष जयराम साळवे, फकीर सुरवसे, भास्कर ओव्हाळ, बाबासाहेब गायकवाड, रामभाऊ गोरे, संजीवन भोसले, बबन भोसले, बापू हावळे, आजिनाथ कांबळे, बाळू रणदिवे, विजय ठोसर, धनाजी यशवद, नाना गोमासे, अण्णासाहेब भालेराव, विकास गोमासे, खंडू चाबुकस्वार, भगवान भोसले उपस्थित होते.

## नळदुर्ग-लोहगाव रस्त्याची दुरवस्था; दोन वर्षांपासुन काम रखडले



### सुस्त प्रशासन व संबंधित ठेकेदाराविरुध्द ग्रामस्थांतुन तीव्र संताप...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ फेब्रुवारी -**

नळदुर्ग ते लोहगाव या रस्त्याची दुरवस्था झाली असुन वाहनचालक व प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे. गेल्या दोन वर्षांपासुन रस्त्याचे काम रखडल्याने प्रशासन व संबंधित ठेकेदाराविरुध्द नागरीकामधुन तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी लक्ष घालुन तातडीने रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी होत आहे.

या स्त्यावर पडलेल्या अस्ताव्यस्त खडीमुळे व अनेक ठिकाणी अर्धवट पुलाच्या कामामुळे रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली असुन यातुन मार्ग काढताना वाहन धारकांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. लोहगाव ते नळदुर्ग या रस्त्याचे काम रेंगाळल्यामुळे या मार्गावर सातत्याने अपघात घडत आहेत.

त्याचबरोबर रस्त्याच्या दुरावस्थेमुळे एक वर्षापासुन एसटी बस सेवा बंद असल्याने शाळकरी विद्यार्थ्यासह नागरीकांना मोठ्या गौरसोईला तोंड द्यावे लागत आहे. संबंधित ठेकेदाराने कांही ठिकाणी पुलाचे काम व रस्त्यावर खडी टाकण्याचे काम केले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुला चारी मारून साइड पट्टी वरील झाडे, झुडपे काढुन साइड पट्टी मोकळी करणे गरजेचे असताना ते काम अर्धवटच ठेवले आहे. त्यातच या अरूंद रस्त्यावर खडी, दगड, गोटे टाकण्यात आल्याने वाहतुकीस त्याचा मोठा अडथळा निर्माण होत आहे.

त्याचबरोबर बांधकामविभाग एखादा मोठा अपघात होऊन वाहनधारकांचा बळी जाण्याची वाट पहात आहे का? असा संतप्त सवालही ग्रामस्थांमधुन उपस्थित केला जात आहे.

बांधकाम विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ याची दखल घेऊन संबंधित ठेकेदारास लवकरात लवकर काम पुर्ण करण्याचे आदेश द्यावेत अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे.

## शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षक परिषद कटिबद्ध : वेनुनाथ कडू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ फेब्रुवारी -**

शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन परिषदेचे राज्य अध्यक्ष वेनुनाथ कडू यांनी केले. दोन दिवसीय राज्य कार्यकारिणी बैठकीत ते अध्यक्षीय समारोपात बोलत होते.

याप्रसंगी सरकार्यवाह राजकुमार बोनकिले, कोषाध्यक्ष राजेंद्र सूर्यवंशी, संघटनमंत्री किरण भावठाणकर, महिला आघाडी प्रमुख पुजाताई चौधरी, राज्य कार्याध्यक्ष माजी आ. नागोराव गाणार, माजी आ. भगवानराव साळुंखे, राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, गणेश पवार उपस्थित होते. बैठकीत सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, संचमान्यता, वाढीव टप्पा वेतन अनुदान, आश्वासीत प्रगती योजना, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न, मुख्याध्यापकांच्या समस्या, शिक्षकांची अशैक्षणिक कामे, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार, नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शिक्षण क्षेत्रातील कंत्राटी नेमणूका, शाळांचे वेतनेत्तर अनुदान, शिक्षक संदेश मुखपत्र, संघटनात्मक वाढ व विस्तार, सदस्यता नोंदणी अभियान, कोषाध्यक्ष अहवाल, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक यांच्या सोबत सहविचार सभा, राज्य अभ्यासवर्ग, महिलांचा संघटनेतील सहभाग, संघटनेचे विविध उपक्रम आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व निर्णय घेण्यात आले. तसेच आगामी काळातील संघटनेची आंदोलनाची दिशा ठरविण्यात आली.

याप्रसंगी अजय वानखेडे, सुभाष गोतमारे, संतोष सुरावार, मधुकर मुप्पीडवार, विनोद पांढरे, मनिषा कोलारकर, रंजना कावळे, सुधिर वारकर, सुरेश पठाडे, गुडुसाब लदाफ, राजेंद्र गुजरे, राजेंद्र वडनेरकर, शंकरराव पुंड, राजेंद्र चोथवे, अमोल काटेकर, सुरेश राठोड, यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# घाटशिळ वाहनतळ परिसरात बनावट पावत्या फाडून तुळजाभवानी मातेच्या भक्तांची लूट

### भाविकांची मात्र सुरक्षा रामभरोसे; न.प.चा कारभार जबाबदारी झटकून फक्त पैसा वसूल...

### पार्किंगचा ठेका संपल्याने पार्किंगमध्ये बनावट पार्किंग पावत्या देऊन भाविकांची लूट...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ फेब्रुवारी -**

शहरात येणाऱ्या भाविकांकडून नगरपरिषदेकडून पार्किंगसाठी पन्नास रुपये आकारण्यात येतात पण भाविकांना दिलेल्या पावतीवर पार्किंगमध्ये गाडी स्वतःच्या जबाबदारीवर लावण्याचा उल्लेख केला असून अनेक भाविक नगर परिषद पन्नास रुपये भाविकांकडून घेते पण सुरक्षा देत नाही म्हणून नगरपरिषदेच्या नावाने चांगलेच खडे फोडताना दिसत आहेत.

नगरपरिषद पार्किंगचा ठेका ७ फेब्रुवारी रोजी संपलेला असून सध्या नगरपरिषद प्रशासनाकडून स्वतः कार पार्किंग चालवली जात आहे.

ठेका संपल्यानंतर नगरपरिषदेच्या सहा कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरूपात पावत्या फाडण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती.

ठेका संपल्यानंतर कार पार्किंग मध्ये अज्ञात व्यक्तींकडून भाविकांना पार्किंगची पावती देऊन नगरपरिषदेला चुना लावण्याचे काम चालू होते.




कार्यालयीन अधीक्षक वैभव पाठक यांनी प्रत्यक्षात कार पार्किंगमध्ये जाऊन पाहणी केली असता दोन व्यक्ती तुळजाई पार्किंग नावाने भाविकाकडून पैसे घेत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी त्या दोन व्यक्तींना पोलिसांच्या ताब्यात दिले.

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी लाखोच्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या वाहनांची संख्या देखील दररोज हजारोच्या घरात असते.

केवळ सहा कर्मचाऱ्यांवर संपूर्ण शहरातील नियोजन होत नसल्याने नगर परिषदेच्या वतीने समृद्धी फॅसिलिटी प्रायव्हेट लिमिटेडच्या ३० कामगारांना कंट्रक्टी पद्धतीने पार्किंग पावत्या पडण्यासाठी घेण्यात आले असून घाटशील रोड, उद्धवराव पाटील सभागृह, हडको, अग्निशामक मैदान, आठवडा बाजार मैदान, सुरेख स्मृती रेस्ट हाऊस, १२४ भक्तनिवास परिसर या ठिकाणी शिफ्ट मध्ये ठेवण्यात आले आहे.

नगरपरिषदेने भाविकांच्या वाहनांना आणि वाहनांमधील वस्तू यांना देखील सुरक्षा द्यावी अशी मागणी भाविकांमधून होत आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पाणी चोरीसाठी नांदूर मधमेश्वर गेटची तोडफोड करून साहित्य चोरीला

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१५: नांदूर मधमेश्वर कालव्याच्या गेटची तोडफोड करून पाणी चोरी करणाऱ्या अज्ञात व्यक्ती विरोधात गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची तक्रार नांदूर मधमेश्वर पाणीपुरवठा सिंचन शाखाधिकारी यांनी दिली आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की नांदुर मधमेश्वर कालवा रब्बी हंगाम आवर्तन सन २०२४-२५ दरम्यान कालव्यातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. जाखमाथावाडी येथील नांदूर मधमेश्वर कालव्याच्या

लोखंडी गेटची अज्ञात व्यक्तीने तोडफोड करून नुकसान व पाणी चोरी करण्याच्यादृष्टीने तोडफोड केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित व्यक्ती विरोधात गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी तक्रार करण्यात आली आहे.

सध्यस्थितित कोपरगाव वैजापूर व गंगापूर तालुक्यासाठी नांदुर मधमेश्वर जलद कालव्याचे रब्बी हंगाम आवर्तन सन २०२४-२५ सुरू आहे. यादरम्यान नियमानुसार टेल च्या वितरिकाचे आवर्तन सुरू असल्याने वरील सर्व वितरिका बंद ठेवण्यात आलेल्या आहे.

नांदुर मधमेश्वर शाखा कालवा क्र १वरील वितरिका क्र ४ व वितरिका क्र ४ (डिवाय ४) वरील डावी उपवितरिका क्र १ (एम एल १) चे गेट बंद असताना पाणी चोरीच्या उद्देशाने अज्ञात व्यक्तीने जाखमाथा येथील (दि १३ ) रात्रीच्या वेळी अनधिकृतरित्या उघडले तसेच दोन्ही लोखंडी गेटची तोडफोड करत. नुकसान केले. दोन्ही गेट चे व्हील चोरून नेले आहे. नांदूर मधमेश्वर पाणीपुरवठा सिंचन शाखा क्रमांक १२ शाखाधिकारी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गंगापूर पोलीस ठाण्यात शासकीय मालमत्तेचे नुकसान करणे व सदरील व्यक्तींनी आयपीसी भा.दं.वि. कलम भा. दं. वि. कलम ४३० अन्वये पाणी चोरीचा गुन्हा केला आहे. तरी सदर व्यक्तीवर गुन्हा नोंदविण्यात यावा अशी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# फर्दापूर येथे शिवजयंती निमित्त समिती स्थापन

फर्दापूर दि १५ फर्दापूर येथे शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समिती स्थापन करण्यात आली.

यावेळी या समितीसाठी राममंदिर येथे सभा घेण्यात आली असून या सभेत गावातील जेष्ठ नागरिक प्रतिष्ठित नागरिक तसेच युवक मोठ्या प्रमाणात हजर होते यावेळी अध्यक्ष आण्णा तांगडे उपाध्यक्ष विष्णू पवार तर सचिवपदी सागर खंडेलवाल यांची निवड करण्यात आली असून यावर्षी सालाबादप्रमाणे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे यात सजीव देखावे तसेच लेझीम पथक, तलवार फिरवणे,काडी फिरवणे, तसेच विविध कला युवक साजरी करणार आहेत. हि मिरवणूक राम मंदिरापासून सर्व गावातून वाजत गाजत निघणार आहे तरी समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव यांनी विनंती केली की शिवजयंती दिवशी मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिक प्रतिष्ठित नागरिक युवक महिला यांनी आवर्जून उपस्थित राहावे असे सांगितले

# सिल्लोड येथे जगद्गुरू संत शिरोमणी सेवालाल महाराज यांची जयंती साजरी

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१५, येथील शिवसेना नेते आ. अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय सेना भवन येथे जगद्गुरू संत शिरोमणी सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंती निमित्त आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते जगद्गुरू संत शिरोमणी सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी आ. अब्दुल सत्तार साहेब यांनी उपस्थितांशी संवाद साधत संत सेवालाल महाराज जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी माजी नगराध्यक्षा राजश्री निकम, शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार, माजी उपनगराध्यक्षा शकुंतलाबाई बन्सोड, कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, सतीश ताठे, नॅशनल सह. सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, शिवसेना तालुकाप्रमुख मारोती पा. वराडे, संजय डमाळे, शिवा टोम्पे, फहिम पठाण, सुनील दुधे, अनुप पाटील, जग्गु चंदनसे, संत सेवालाल जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी शंकरराव चव्हाण, वसंतराव पवार, विठ्ठल पवार, नारायण चव्हाण, दत्ता पवार, अरुण चव्हाण, लहूदास राठोड , सुभाष जाधव, ज्ञानेश्वर राठोड, बाबासाहेब राठोड, विठ्ठल राठोड, दिनेश चव्हाण, मनोज राठोड, चंद्रशेखर राठोड आदींची उपस्थिती होती.

# हिंगोली शहर व्हॉइस ऑफ मीडिया कार्यकारिणी गठीत

हिंगोली : जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर उंडाळे यांच्या अध्यक्षतेखाली हिंगोली शहरात व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेची कार्यकारिणी नुकतीच गठीत करण्यात आली. या कार्यकारिणीमध्ये विविध पदाधिकारी व सदस्यांची एकमताने निवड करण्यात आली असून, संघटनेच्या भविष्यातील कार्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले गेले आहे.



या कार्यकारिणीमध्ये पुढील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे:

महानगराध्यक्ष: विजय गुंडेकर ,कार्याध्यक्ष: पल्लवी अटल,शहर संघटक विकास जाधव, सचिव: कपिल सावळे, संघटक: शंकर शेळके, सहसचिव: विष्णू धामणे व प्रशांत गुप्ता ,प्रवक्ता: सुमित कान्हेड ,संघटक: सचिन पाचमासे,कोषाध्यक्ष: यू.एच. बलखंडे ,प्रसिद्धीप्रमुख: राजेश मगर ,उपाध्यक्ष: निलेश गरवारे सदस्य: कृष्णा कर्हाळे या बैठकीत जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर उंडाळे यांनी कार्यकारिणीच्या सदस्यांना मार्गदर्शन करताना संघटनेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. माध्यम क्षेत्रातील समस्यांवर आवाज उठविणे, पत्रकारांच्या हितासाठी कार्य करणे आणि सामाजिक भान राखत विविध उपक्रम राबविणे, हे संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

महानगराध्यक्ष विजय गुंडेकर यांनी कार्यकारिणीच्या वतीने संघटनेच्या आगामी योजना आणि उपक्रमांविषयी माहिती दिली. शहर संघटक विकास जाधव यांनी नवनियुक्त सदस्यांना संघटनात्मक बांधिलकीचे महत्व समजावून सांगितले. संघटनेच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच हिंगोली शहर कार्यकारिणीला नवीन ऊर्जा मिळाली असून, आगामी काळात पत्रकारिता क्षेत्रातील विविध समस्यांवर प्रकाश टाकण्याचा निर्धार कार्यकारिणीने व्यक्त केला आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १२३/२०२५

अर्जदार : १. लक्ष्मण पिता चत्रु सोमासे, २. परिगाबाई भ्र.चत्रु सोमासे, ३. शोभा भ्र.अजिनाथ जाधव, रा.आंचलगाव, ता. वैजापुर जि. औरंगाबाद ४. बालचंद पिता चत्रु सोमासे, अर्जदार नं. १, २ व ४ रा.दे-हळ, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. व्ही.जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १. ३ आणि ४ यांचे पिता आणि अर्जदार नं. २ यांचे पती नामे चत्रु दादा सोमासे यांचा मृत्यु दि.१९/०२/२०२४ रोजी वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालय छ. संभाजीनगर (घाटी) रुग्णालयात उपचारादरम्यान झालेला असुन त्यांचा अंतविधी मौजे दे-हळ, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर येथे झालेला आहे. मयत चत्रु दादा सोमासे यांना अर्जदार नं. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत चत्रु दादा सोमासे यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीरा कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १५/०२/२०२५ रोजी दिले.

पु.ता. २१/३/२०२५

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## जाहीर प्रगटन

दि. १५/०२/२०२५

माझे पक्षकार श्री. १) राजाराम आधार हिरे, वय ५४ वर्ष धंदा शेती, २) गजानन आधार हिरे, वय- ५२, धंदा शेती, सर्व रा. किन्ही, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि,

मौजे किन्ही शिवार, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर मधील गट क्र. ०३ मधील आधार धोंडू हिरे जाहीर प्रगटन देणार क्र. १,२ यांचे वडील यांच्या नावे असलेली हे. ९६ आर., पोटखराब है. ०२ आर. जिच्या चतुर्सिमाः- पूर्वेस-नाला, पश्चिमेस सिंधुबाई आधार हिरे यांची नावावरील शेतजमीन, दक्षिणेला-दीपक शंकर पवार यांची शेतजमीन, उत्तरेला राजाराम आधार हिरे यांची शेतजमीन. तसेच मौजे किन्ही शिवार, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर मधील गट क्र. ०३ मधील सिंधुबाई आधार हिरे जाहीर प्रगटन देणार क्र. १,२ यांची आई यांच्या नावे असलेली ०० हे. ५८ आर. जिच्या चतुर्सिमा पूर्वेस-आधार धोंडू हिरे यांची नावावरील शेतजमीन, पश्चिमेला नाला, उत्तरेला गजानन आधार हिरे यांची शेतजमीन, दक्षिणेला गजानन आधार हिरे यांची शेतजमीन. हि जाहीर प्रगटन देणार क्र. १ व २ यांची वडिलोपार्जित शेतजमीन असून, सदर मिळकती मध्ये जाहीर प्रगटन देणार क्र. १ व २ वाटा, हिस्सा घेणे बाकी आहे. तरी वरील जाहीर प्रगटन देणार क्र. १ व २ यांचे आई वडील आधार धोंडू हिरे व सिंधुबाई आधार हिरे हे त्यांच्या नावे जाहीर प्रगटन देणार क्र. १ व २ यांची वडिलोपार्जित शेतजमीन असल्याचा गैरफायदा घेवून जाहीर प्रगटन देणार क्र. १ व २ यांची संमती नसताना परस्पर विनासंमती विक्री करण्याच्या मार्गावर आहे. तरी या जाहीर प्रगटनद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, वरील मिळकती संदर्भात कोणताही खरेदी विक्री, तारण, गहाण, इत्यादी व्यवहार करण्यात येवू नये अन्यथा संबंधित व्यवहार करणार व्यक्तीवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल करिता सदर जाहीर प्रगटन दिले आहे.

सही सही
१ राजाराम आधार हिरे २ गजानन आधार हिरे
सर्व रा. किन्ही ता सोयगाव जि.छ. संभाजीनगर

सदरची जाहीर नोटिस पक्षकाराचे माहितीवरून आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रांवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्द केली असे.

मार्फत
ॲड. वाय. आर. जावळे
मो.नं. ९४०३२५१७४६

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (४१) गोरक्षण

घटना आहे पुसदची. जंगल सत्याग्रहाच्या आदल्या दिवशीची. म्हणजे २० जुलै १९३० ची. वाटेत एका गोठाणावर एक तरणीताठी गाय हातात धरून दोन खाटीक उभे होते. डॉक्टरांनी विचारले गाय कोठे चालविली ? खाटीक म्हणाले आम्ही थोड्याच वेळात तिची कुर्बानी करणार आहोत. भर हिंदू वस्तीच्या गावात गाईची अशी राजरोस हत्या ही कल्पनाच डॉक्टरांना असह्य करत होती. डॉक्टरांनी किंमत विचारली. त्यावर खाटीक म्हणाला आम्ही वर्षानुवर्षे येथे गाई मारत असतो व मांसाचे रतीब पुरवतो. २५ ते ३० रुपये कमाई होते. डॉक्टर ३० रुपये द्यायला तयार झालेत. पण तो खाटीक अजूनच उग्र स्वरात मी तुमच्या देखतच गाय मारतो असा ताठा मिरवू लागला. दोघात खडाजंगी झाली. तो खाटीक गाय व तू दोघांनाही मारतो असे म्हणू लागला. तो तंटा पाहण्यास खूप गर्दी जमली. आणि आरक्षक अधिकाऱ्यांनी दोघांनाही पकडून ठेवतो अशी धमकी वजा शिक्षा सुनावली. तो खाटीक वरमला व तीस रुपयात गाय विकून त्यांनी तिथून काढता पाय घेतला. डॉक्टरांनी गाय तेथील गोरक्षण संस्थेला दिली. या प्रसंगानंतर कानडे शास्त्रींनी एक सभा घेतली व डॉक्टरांच्या देशभक्तीची मुक्तकंठाने स्तुती करून एक क्रांतिकारक म्हणून उल्लेख केला. डॉक्टरांनी सर्वांना समर्थ बना असा संदेश दिला. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.४१/२०२५

अर्जदारः- १) शिवाजी रघुनाथ नेरपगार वय-६४वर्ष धंदा-शेती २) मनीष शिवाजी पाटील, वय-३७वर्ष धंदा-शेती ३) सुनिल शिवाजी नेरपगार वय-३५वर्ष धंदा-शेती वरील सर्व रा. गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरणः- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी.सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांची पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ यांची आई कै. हिराबाई शिवाजी नेरपगार यांचा दिनांक-२५/०४/२०२१ रोजी मौजे नगाव क।। ता. अमळनेर, जि. जळगाव येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे कै. हिराबाई शिवाजी नेरपगार यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ३ यांना कांयदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २७/०३/२०२५. आज दि. १३/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन
विभागीय लिपीकसहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. ६६/२०२५

अर्जदारः १) सुनंदाबाई नाना पाटील, वय-६६ वर्ष धंदा-घरकाम २) गजेंद्र नाना पाटील, वय-३७ वर्ष धंदा-शेती ३) विश्वजित नाना पाटील, वय-३४ वर्ष धंदा-शेती रा. माळेगाव ता. सोयगाव, जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण: वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील कै. नाना महारु पाटील यांचा दिनांक-२८/०८/२०२२ रोजी वृद्धपकाळाणे मौजे माळेगाव ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे कै. नाना महारु पाटील यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ३ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख १७/०४/२०२५. आज दि. १३/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन
विभागीय लिपीकसहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. ५३/२०२५

अर्जदारः- १) विजय रामा मांडोळे वय-६४ वर्ष धंदा-शेती रा. वडगाव (तिग्जी), ता. सोयगाव, जि. औरंगाबाद २) कै. अशोक रामा मांडोळे (मयत) २-१) वाल्याबाई अशोक मांडोळे वय-६१वर्ष धंदा-घरकाम २-II) अरुण अशोक मांडोळे वय-३३वर्ष धंदा-शेती ३) चैत्राम रामा मांडोळे वय-६२वर्ष धंदा-शेती ४) यशोदाबाई अशोक लासुरे वय-६८वर्ष धंदा-घरकाम २ ते ४ रा. खिर्डी-गणेश, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर ५) लताबाई गोरख क्षीरसागर वय-६६वर्ष धंदा-घरकाम रा. येसगाव ता. कोपरगाव, जि. अहमदनगर -

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ ते ५ यांचे वडील असून अर्जदार क्र.२-१) यांचे सासरे व अर्जदार क्र. २-ळळ) यांचे आजोबा कै. रामा तुकाराम मांडोळे यांचा दिनांक-१८/०१/२००९ रोजी वृद्धपकाळाणे मौजे खिर्डी-गणेश, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे कै. रामा तुकाराम मांडोळे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ५ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ५ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २६/०३/२०२५. आज दि. १३/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

वरव विभागीय लिपीक दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

आदेशावरुन
विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. ५४/२०२५

अर्जदार : १) सयाबाई दगडू भोई, वय-७०वर्ष धंदा-घरकाम २) धर्मेंद्र दगडू भोई, वय-३६वर्ष धंदा-शेती ३) पुष्पाबाई रामचंद्र वाल्डे वय-३८वर्ष धंदा-घरकाम वरील १ ते ३ रा.घोरकुंड, ता. सोयगाव जि. औरंगाबाद ४) सुनिता पारस कंदिलकर, वय-४०वर्ष धंदा-घरकाम रा. दहेगाव, ता.चांदवड, जि. नाशिक.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी.सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील कै. दगडू देवचंद भोई यांचा दिनांक ०७/०२/२०२१ रोजी मौजे घोरकुंड, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. दगडू देवचंद भोई यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २७/०३/२०२५. आज दि. १३/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

आदेशावरुन
विभागीय लिपीकसहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. २४/२०२५

अर्जदारः- १) बेबाबाई भागवत पाटील, वय-६४ वर्ष धंदा-घरकाम २) संतोष भागवत पाटील, वय-४०वर्ष धंदा-शेती रा. माळेगाव ता. सोयगाव, जि. औरंगाबाद ३) मंगलाबाई विजय खैरनार वय-४४वर्ष धंदा-घरकाम रा. बनोटी ता.सोयगाव, जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी.सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील कै. भागवत विठ्ठल पाटील यांचा दिनांक- ११/१०/२०२४ रोजी वृद्धपकाळाणे मौजे माळेगाव ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे कै. भागवत विठ्ठल पाटील यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ३ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख १०/०३/२०२५. आज दि. १३/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन
विभागीय लिपीकसहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.३०/२०२५

अर्जदारः- १) गं. भा. कलाबाई भिमसिंग शिंदे वय-७० वर्ष धंदा-घरकाम २) रवींद्र भिमसिंग शिंदे, वय-५० वर्ष धंदा-नोकरी ३) प्रवीण भिमसिंग शिंदे वय- ४८वर्ष धंदा-शेती ४) श्यामसिंग भिमसिंग शिंदे वय-४४वर्ष धंदा-शेती ५) रामसिंग भिमसिंग शिंदे वय ४२ वर्ष धंदा-शेती वरील १ ते ५ रा. म्हसिकोठा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. ६) शालिनी जयेंद्र देवरे, वय-४६ वर्ष धंदा-घरकाम रा. नाणे, ता.जि.धुळे

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरणः वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील कै. भिमसिंग भावसिंग शिंदे यांचा दिनांक- ०५/०२/२०१५ रोजी मौजे म्हसिकोठा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ हे दारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे कै. भिमसिंग भावसिंग शिंदे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ६ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ६ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख १९/०३/२०२५. आज दि. १३/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन
विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. ६५/२०२५

अर्जदारः- १) मंगलाबाई निंबाजी राऊत वय-४५वर्ष धंदा-घरकाम २) विशाल निंबाजी राऊत, वय-२४ वर्ष धंदा-शेती ३) दिपाली परमेश्वर जाधव वय-२६ वर्ष धंदा घरकाम ४) शोभाबाई निंबाजी राऊत वय-४५ वर्ष धंदा-घरकाम ५) वैभव निंबाजी राऊत, वय-२० वर्ष धंदा शेती ६) चेतन निंबाजी राऊत वय-१८ वर्ष धंदा- शेती ७) आदित्य निंबाजी राऊत वय-१२वर्ष धंदा- शिक्षण (अर्जदार क्र. ७ साठी अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र.४) सर्व रा. इंदिरानगर, बनोटी ता. सोयगाव जि. औरंगाबाद

-: विरुध्द

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरणः- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ व ४ यांचे पती व अर्जदार क्र. २, ३ व ५ ते ७ यांचे वडील कै. निंबाजी पंडित राऊत यांचा दिनांक-२२/०८/२०२३ रोजी सिद्धीविनायक हॉस्पिटल पाचोरा ता.पाचोरा, जि. जळगाव येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ७ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ७ हे कै. निंबाजी पंडित राऊत यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ७ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ७ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख १६/०४/२०२५. आज दि. १३/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन
विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. ६१/२०२५

अर्जदारः- १) गयाबाई सुपडू सोनवणे, वय-७०वर्ष धंदा-घरकाम २) भाऊसाहेब सुपडू सोनवणे वय-५६ वर्ष धंदा-शेती ३) जुलाल सुपडू सोनवणे वय-५०वर्ष धंदा-शेती वरील १ ते ३ रा. शिंदोळ ता. सोयगाव जि. औरंगाबाद ४) संगीता चंद्रभान सोळुंखे, वय-५४वर्ष धंदा-घरकाम रा. बामरुड खु। प्र. ता.पाचोरा, जि. जळगाव. ५) आशाबाई शिवाजी पाटील वय-५२वर्ष धंदा-घरकाम रा.रमणे ता. चाळीसगाव, जि. जळगाव. ६) प्रतिभा शालिग्राम पाटील वय-४८वर्ष धंदा-धरकाम रा. तारखेडा. ता.पाचोरा, जि. जळगाव. ७) सरला योगेश तावडे वय-४६वर्ष धंदा-घरकाम रा.नगरदेवळा बु. ता.पाचोरा, जि. जळगाव -

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र. २ ते ७ यांचे वडील कै. सुपडू तंगा सोनवणे यांचा दिनांक-०८/०५/२०२० रोजी मौंजे शिंदोळ, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ७ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ७ हे कै. सुपडू तंगा सोनवणे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ७ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ७ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख १६ /०४/२०२५. आज दि. १३/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन
विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र.१०२/२०२५

पुढील तारीख २९/०२/२०२५

अर्जदार : १) सौ. मनकर्णाबाई भ्र. भाऊसाहेब टेंगडे, रा. पळसवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २) श्रीमती गंगाबाई भ्र. मनसुब शिंगरे, रा. नावडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३) साहेबराव पिता मनसुब शिंगरे, रा. नावडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४) सौ. निर्मला भ्र. साईनाथ जाधव, रा. आंचलगाव, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद ५) दिलीप पिता मनसुब शिंगरे, रा. नावडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ६) विलास पिता मनसुब शिंगरे, रा. नावडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी, जिल्हा औरंगाबाद

अर्ज :- कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. (Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी, अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ कृष्णा पा. जाधव यांचे मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, श्री. किसन पिता दगड्डु शिंगरे हे दिनांक २९/०७/२००७ रोजी मौजे नावडी, ता. कन्नड येथे मरण पावले, मयत श्री. किसन शिंगरे हयांना पत्नी नामे श्रीमती ठगणाबाई ही होती, जी दिनांक ०३/११/२०१९ रोजी मरण पावली. तिला मुलबाळ न झाल्यामुळे मयत श्री किसन शिंगरे हयांनी श्रीमती मिराबाई हिचे सोबत दुसरा विवाह केला, मात्र तिला कोणतेही मुलबाळ होवु शकले नाही व ती उपत्यहिन अवस्थेत दिनांक २९/०९/२०२२ रोजी मरण पावली. मयत श्री. किसन शिंगरे हयास दरम्यानचे काळात पहिली पत्नी नामे श्रीमती ठगणाबाई हिचे पासुन श्री. मनसुब, आणी सौ. मनकर्णाबाई भ्र. भाऊसाहेब टेंगडे (अर्जदार क्र. १) ही झालीत. त्यापैकी मुलगा नामे मनसुब पिता किसन शिगरे हा दिनांक २५/०६/२०१४ रोजी मरण पावला. मयत श्री. मनसुब पिता किसन शिंगरे हयाची अर्जदार क्र. १ सौ. मनकर्णाबाई ही बहिण असुन अर्जदार क्र. २ श्रीमती गंगाबाई ही पत्नी आहे तसेच अर्जदार क्र. ३ साहेबराव, अर्जदार क्र. ५ दिलीप आणी अर्जदार क्र. ६ विलास ही मुले असून अर्जदार क्र. ४ सौ. निर्मला भ्र. साईनाथ जाधव ही मुलगी आहे. मयत श्रीमती ढगणाबाई भ्र. किसन, मयत श्रीमती मिराबाई भ्र. किसन तसेच मयत श्री. मनसुब पिता किसन शिंगरे हयांना अर्जदार क्र. १ ते ६ हयांचे शिवाय इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. मयत हे हिंदू कायदयाचे आधिन येत असुन मयतांनी कोणतेही मृत्युपत्र अथवा ईच्छापत्र लिहुन ठेवलेले नव्हते व नाही. अर्जदारांना शासकिय व निमशासकिय कामासाठी, विविध शासकीय योजनांचे लाभ मिळविण्यासाठी आणि महसुल अभिलेखात नोंद होवुन मिळणे साठी कायदेशीर वारसाहक्क प्रमाणपत्राची (Legal Heirship Certificate) आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज दिलेला आहे. अर्जदार हे वरील मयतांचे कायदेशीर वारस असुन अर्जदार हे वरील प्रमाणे मागणी केलेले कायदेशीर वारसाहक्क प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळण्याबाबत पात्र आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन.

दिनांक १४/२/२०२५

आदेशावरुन
क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# भारत-अमेरिका मैत्रीचे नवे पर्व

जगातील सर्वांत मोठी लोकशाही तसेच सर्वांत जुनी लोकशाही असलेल्या देशांच्या प्रमुखांची बहुचर्चित भेट नुकतीच झाली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीकडे या दोन देशांतील लोकांचेच नाही तर जगातील सगळ्या देशांचे लक्ष लागले होते. ही फक्त दोन देशांतील राष्ट्रप्रमुख वा सरकारप्रमुखांची भेट नव्हती, तर दोन सख्ख्या मित्रांची पण भेट होती. मोदी आणि ट्रम्प यांच्यात एक विशेष असा मैत्रिभाव आहे. त्यामुळे हे दोन नेते जेव्हा भेटतात, तेव्हा त्यात फक्त औपचारिकता आणि शिष्टाचार नसतो, तर आपुलकीची आणि आत्मीयतेची भावना असते. एक मित्र दुसऱ्या मित्राला भेटताना त्यांच्यात जो मनमोकळेपणा असतो, तसा मनमोकळेपणा या दोन नेत्यांच्या भेटीत असतो. त्यामुळे या दोन नेत्यांच्या भेटीत आणि बैठकीत फक्त चर्चा होत नाही तर गुजगोष्टी होतात, त्यामुळे दोन देशांतील अनेक मुद्यांवर अतिशय सहजतेने मार्ग निघून जातो.

नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेतली, तर डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष झाले. लोकप्रियतेत या दोन्ही नेत्यांचा हात जगात कोणी धरू शकत नाही. या दोन नेत्यांमधील आणखी एक साम्य म्हणजे दोन्ही नेत्यांनी आपल्या देशातील जनतेत राष्ट्रवादाची भावना जागवली. आधी देश, मग पक्ष आणि सर्वांत शेवटी मी म्हणजे व्यक्ती अशी मोदी यांची पर्यायाने भाजपाची भूमिका असताना ट्रम्पही अमेरिका फर्स्ट या धोरणाचे कट्टर पुरस्कर्ते आहेत, हे त्यांच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीवरून स्पष्ट झाले. अमेरिकेत बेकायदेशीररीत्या घुसलेल्यांविरुद्ध ट्रम्प यांनी अध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर कारवाईही सुरू केली आहे. याच मालिकेत १०४ भारतीयांना अमेरिकेच्या लष्करी विमानाने अमृतसरला आणण्यात आले. हाताला बेड्या बांधलेल्या स्थितीत या भारतीयांना अमेरिकेने परत पाठवल्याच्या मुद्यावरून गदारोळही झाला होता. विरोधी पक्षांनी यावर आक्षेप घेतला होता. भारत सरकारनेही घुसखोरांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. आपल्या देशातील जनतेच्या भावनाही घुसखोरीच्या मुद्यावरून तीव्र आहेत. त्यामुळे अवैध मार्गाने घुसलेल्यांवर कारवाई करण्याचा अमेरिकेचा अधिकार कोणी नाकारणार नाही, अमेरिकेला तसा अधिकार आहे, पण भारतात परत पाठवणाऱ्या भारतीयांना यापुढे तरी बेड्या बांधून अमेरिकेने परत पाठवू नये, अशी सगळ्यांची स्वाभाविक अपेक्षा राहू शकते. या मुद्यावरही मोदी आणि ट्रम्प यांच्यात चर्चा झाली असू शकते.

मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटीनंतर दोन देशांनी एक संयुक्त निवेदन जारी करत दोन देशांच्या दृढमैत्रीचा दाखला देताना दहशतवादाविरुद्ध एकत्र लढण्याचा निर्धारही व्यक्त केला. दहशतवादाच्या वैश्विक संकटाविरुद्ध लढण्याची तसेच जगाच्या कानाकोपऱ्यात दहशतवाद्यांचे लपण्याचे जे अड्डे आहेत, ते नष्ट करण्याची आवश्यकता यातून व्यक्त करण्यात आली. भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांना दहशतवादाचे जेवढे चटके बसले तेवढे खचीत जगातील अन्य देशांना बसले असतील. दोन्ही देशांनी आपल्या संयुक्त निवेदनात पाकिस्तानचे स्पष्ट नाव घेतले नसले तरी त्यांचा निवेदनातून असलेला रोख लपून राहिलेला नाही. पाकिस्तान दहशतवादाचे समर्थन करतो, आपल्या भूमीचा वापर दहशतवादी संघटनांना दुसऱ्या देशाविरुद्ध दहशतवादी कारवायासाठी करू देतो, असा आरोप करत पाकिस्तानविरुद्ध कारवाई करण्याचा इशाराही संयुक्त निवेदनातून देण्यात आला. २६/११ तसेच पठाणकोटच्या दहशतवादी हल्ल्यातील गुन्हेगारांना पाकिस्तानने न्यायालयासमोर खेचून आणले पाहिजे, असे या निवेदनात म्हटले आहे. याचा अर्थ २६/११ तसेच पठाणकोटवरील दहशतवादी हल्ल्यातील गुन्हेगार पाकिस्तानला माहिती आहे, पाकिस्तान त्यांना पाठीशी घालत आहे, असा अप्रत्यक्ष आरोप या निवेदनातून करण्यात आला. अल कायदा, लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि इसिस यांच्यासह जगातील सर्व दहशतवादी संघटनांविरुद्ध एकत्रित लढवण्याचे आवाहन या निवेदनातून करण्यात आले. त्यामुळे पाकिस्तानला मिरची लागणे स्वाभाविक होते. चोराच्या उलट्या बोंबा याप्रमाणे पाकिस्तानने भारतावरव आरोप केला. दहशतवादी घटनांना भारताचा छुपा पाठिंबा असल्याचा कोणाचाही विश्वास बसणार नाही, असा आरोप करत त्या देशाने आपलेच हसे करून घेतले. पाकिस्तानने या निवेदनावरून आपल्या सवयीप्रमाणे आगपाखड केली असली तरी यातून फारसे काही साध्य होणार नाही. दहशतवादी संघटनांशी आपले लागेबांधे असल्याचे पाकिस्तान नाकारू शकणार नाही, तसेच आपले निरपराधित्वही सिद्ध करू शकणार नाही. पाकिस्तान आणि दहशतवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. वा दोन्ही समानार्थी शब्द आहेत, असे म्हटले तरी ते चूक ठरू नये.

भारत आणि चीन यांचे संबंध काहीसे तणावपूर्ण आहे. सीमावाद हा दोन देशांतील तणावाचे कारण आहे. चीनचे सैनिक नेहमीच भारताच्या हद्दीत घुसखोरी करत असतात. त्यामुळे भारत-चीन सीमावादात मध्यस्थी करण्याचा प्रस्तावही या भेटीत डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासमोर ठेवला होता. पण द्विपक्षीय चर्चेवर विश्वास दाखवत भारताने तो सविनय फेटाळून लावला आहे. भारत आणि चीन यांच्यातील तणावाच्या मुद्यावर आम्ही द्विपक्षीय चर्चेतून मार्ग काढू, असा जो विश्वास भारताने व्यक्त केला, तो भारताच्या आतापर्यंतच्या भूमिकेशी सुसंगत असाच आहे. अमेरिकेने भारतासमोर असा प्रस्ताव ठेवण्याची ही पहिलीच वेळ नाही. आपल्या अध्यक्षपदाच्या पहिल्या कार्यकाळातही ट्रम्प यांनी भारतासमोर असा प्रस्ताव ठेवला होता. यामागचा ट्रप यांचा छुपा हेतू काय असू शकतो, याची आपल्याला कल्पना नसली तरी त्यांची भूमिका प्रामाणिकपणाची आणि भारताच्या हिताची असावी, असे आपण समजू शकतो.

चीनशी मैत्रीचे संबंध कायम ठेवण्याची ग्वाही ट्रम्प यांनी दिली आहे. चीन हा आमच्यासाठी महत्त्वपूर्ण देश आहे. त्या देशासोबतचे संबंध पुन्हा सुरळीत झालेले असतील, असे ट्रम्प यांनी सांगितले. कोरोना आधीपर्यंत चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांच्याशी आपली चांगली मैत्री होती, असेही ट्रम्प यांनी स्पष्ट केले. याचाच अर्थ कोरोना काळानंतर चीनचे अमेरिकेसोबत वा ट्रम्प यांच्यासोबत जे संबंध होते, ते तसे राहिले नाहीत, त्यात तणाव आला, हे स्पष्ट होते. याची कारणमीमांसा त्यांनी केली नसली तरी भारत आणि चीन यांचे संबंध आता जसे होते वा आहे, तसेच ते अमेरिकेसोबतही आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध संपवण्यात चीनची भूमिका महत्त्वपूर्ण राहू शकते, असा विश्वासही ट्रम्प यांनी व्यक्त केला तो अनाठायी म्हणता येणार नाही. अध्यक्षपदाच्या लढतीत असताना ट्रम्प यांनी, मी अमेरिकेचा अध्यक्ष झाल्यावर लगेच रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध थांबवतो, असे म्हटले होते. ट्रम्प यांचे ताजे विधान पाहिले तर रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध आपण थांबवू शकत नसल्याची एकप्रकारची असहायता त्यांनी व्यक्त केली असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्री स्वीकारल्यानंतर निवडणूक प्रचारात दिलेल्या अनेक आश्वासनांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने त्यांनी पावले उचलली आहेत, असे दिसते. पण ट्रम्प यांचे अनेक निर्णय वादग्रस्त ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. ट्रम्प यांच्या कोणत्याही निर्णयाचा बरावाईट परिणाम हा फक्त अमेरिकेपुरता मर्यादित राहात नाही, तर साऱ्या जगावर त्याचा परिणाम होत असतो. मात्र काहीही असले तरी भारत आणि अमेरिका यांची मैत्री जगाच्या इतिहासात मैलाचा नवा टप्पा ठरणार यात शंका नाही. कारण ही मैत्री फक्त दोन देशांची नाही तर लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या जगातील दोन प्रमुख देशांची आहे. अमेरिका हा आधीपासून महाशक्ती असला तरी भारताची वाटचालही आता विश्वगुरूच्या दिशेने सुरू झाली आहे. जगातील अनेक देशांना भारताकडून मोठ्या अपेक्षा आहे. त्यामुळे त्याच भूमिकेतून आपण याकडे पाहिले पाहिजे. ▮

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# इंडियाज गॉट पेशन्स?

इंडियाज गॉट लेटेंट या कार्यक्रमामध्ये प्रसिद्ध युट्यूबर रणवीर अलाहाबादियाने एका स्पर्धकाला विचारलेल्या अश्लील प्रश्नावरून खूप मोठा वाद निर्माण झाला आहे. मुळात हा प्रश्न अश्लीलही नव्हता. सध्याच्या युगात अश्लील कशाला म्हणायचं हा एक मोठा प्रश्न आहे. जसजसं जग बदलतं तसतशा गोष्टी, भाषाशैली, जीवनशैली बदलते. त्यामुळे एखादी गोष्ट २० वर्षांपूर्वी वर्ज्य मानली गेली असेल तर ती आता स्वीकार्य होऊ शकते. कारण काळ बदलतो आणि त्याकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोनही बदलतो. मात्र रणवीरने केलेली टिप्पणी ही अश्लीलतेच्याही पलीकडची आहे. केवळ अश्लील म्हणत या प्रश्नावर पडदा टाकता येत नाही. पहिली गोष्ट रणवीर आणि त्याच्या सहकाऱ्यांवर कारवाई होत आहे आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने नोटीस पाठवल्यानंतर कार्यक्रमाचा तो भाग काढून टाकला आहे. तसेच रणवीर आणि समय रैनाने याबाबत माफी देखील मागितली आहे. ज्यांच्यावर जी कायदेशीर कारवाई व्हायची ती होईल. त्यांचे अनेक फॉलोवर्स त्यांना अनफॉलो करून जातील. पण हा विषय या सर्व कारवाईच्या पलीकडचा आहे. हा विषय चिंतेचा आहे, भारताच्या भविष्याचा आहे.

रणवीरची बाजू घेणाऱ्या लोकांनी असं म्हटलं की जे लोक रणवीरवर टीका करतात ते आई-वडिलांवरून शिव्या नाही का देत? किंवा टीका करणाऱ्या लोकांची ब्राऊजर हिस्ट्री तपासायला हवी. मला या महाभागांना प्रश्न विचारायचा आहे की तुम्हाला लोकांच्या बेडरुममध्ये शिरायचंच का आहे? अनेक लोक शिव्या देत असतील, पण शिव्या देणं वाईट असतं हे समाजाने स्वीकारलं आहे ना? कुणीही घरात शिव्या देतं का? आणि जे देत असतील ते सगळीकडेच शिव्या देत बसतील का? सोशल मीडियावर काही गाढवं असतात. जे शिव्या दिल्याशिवाय बोलतंच नाहीत. तुमचे विचार पटले नाहीत तर लगेच घाणेरड्या शिव्या द्यायला सुरुवात करतात. म्हणे आम्ही असेच आहोत रांगडे. मग तुम्ही जिथे नोकरी करता, तिथे सहकाऱ्यांशी, बॉसशी अशाच भाषेत बोलता का? नाही ना? म्हणजे कुठे कोणती भाषा वापरायची याचं भान असावं लागतं. तुमच्या वाह्यात बोलण्यावरून तुम्ही स्वतःला कूल असल्याचे दाखवत असलात तरी समाजाच्या दृष्टिकोनातून तुम्ही वाह्यातच असता. दुसरी गोष्ट लोकांचे ब्राऊजर का तपासायचे आहेत. समजा लोक अश्लील चित्रपट पाहत असतील. पण अश्लील चित्रपट पाहणं वाईट असतं हे समाजाने मान्य केलेलं आहे ना? घरात सर्वांसमोर लोक असे चित्रपट पाहतात का? नाही ना? मग रणवीरच्या वक्तव्याचा आणि कुणाच्या वैयक्तिक आयुष्याचा संबंध जोडता कामा नये. रणवीरने जे म्हटलं ते अत्यंत घृणास्पद होतं हे मान्य करूनच चर्चा पुढे जायला हवी. रणवीर जे म्हणाला ते अश्लीलतेच्या पलीकडचं आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे.



रणवीरचे वैयक्तिक पॉडकास्ट तुम्ही पाहिले असतील तर त्याने अनेकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. काही आध्यात्मिक साधक व गुरूंच्या मुलाखती देखील त्याने घेतल्या आहेत आणि या पॉडकास्टमधून तो स्वतः साधना करत असल्याचे त्याने कबूल केले आहे. जी भाषा त्याने इंडियाज गॉट लेटेंटमध्ये वापरली, तशी भाषा त्याने स्वतःच्या पॉडकास्टवर कधीच वापरली नव्हती. पण तो कार्यक्रमच इतका वाह्यात आहे की त्याच्यातला वाह्यातपणा बाहेर आला. मला प्रश्न पडतो की रणवीरच्या आई-वडिलांना काय वाटलं असेल? त्याच्या घरच्यांची यावर काय प्रतिक्रिया असेल? असो, तर या विषयावर अनेकांनी आपलं मत व्यक्त केलं आहे. रणवीर किंवा आणखी अनेक इन्फ्युएंसर यांचे अनेक फॉलोवर्स असतील, पण आपल्या देशात असे अनेक लोक आहेत ज्यांना हे इन्फ्युएंसर कोण आहेत, हे माहितीच नसेल. दुसरी गोष्ट हा कंटेंट किंवा ही चर्चा वयात न आलेली किंवा नुकतीच वयात आलेली मुलं ऐकत व पाहत असतील. कारण त्यांच्या हातात मोबाईल आलेला आहे. मग त्यांना काय वाटत असेल? आपण कितीही आधुनिक झालो, कितीही मोकळ्या गप्पा मारल्या तरी आपण भारतीय आहोत हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही. आपल्याला अत्यंत आधुनिकीकरण स्वीकारायचं आहे आणि हे करत असताना आपल्याला आपलं भारतीयत्व, आपलं हिंदुत्व सोडायचं नाही. कारण धर्मवेड्या ख्रिस्ती आणि इस्लामी शक्तीने अर्ध जग पादाक्रांत केलं असलं तरी हिंदू संस्कृती अजूनही तग धरून आहे. नव्हे आज जगात हिंदुत्वाचा डंका वाजत आहे. कुंभमेळ्यात इथल्या इन्फ्युएंसर्सना मोनालिसाचे डोळे आवडले असले तरी विदेशातील लोकांना इथल्या संस्कृतीचं आकर्षण वाटत आहे. कारण ज्या उपभोगाच्या गोष्टी इथले इन्फ्युएंसर्स करतात, त्या उपभोगाची परिसीमा पाश्चात्त्य जगाने गाठलेली आहे आणि त्यामुळे त्यांच्या संस्कृतीची प्रचंड हानी सुद्धा झालेली आहे. म्हणूनच त्यांना आता भोगऐवजी भारतातला योग खुणावत आहे.

भारतीय हिंदू संस्कृतीचं आणखी एक वैशिष्ट्य असं की इथल्या साधू-संतांनी जगाने हिंदू व्हावं म्हणजेच धर्मांतरण करावं अशी इच्छा न ठेवता जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागितलेलं आहे. जगातल्या दोन मोठ्या धार्मिक सत्ता यासाठी परवानगी देत नाहीत. त्यांच्या दृष्टिकोनातून तुमचं कल्याण करून घ्यायचं असेल तर तुम्हाला त्यांचा धर्म स्वीकारावा लागतो. तुम्ही त्यांच्या धर्माचे नसाल तर तुमचं कल्याण व्हावं अशी इच्छा बाळगणे ही त्यांच्या धर्माची शिकवण नाही. इतकंच काय तर सर्व जगाने त्यांचा धर्म स्वीकारावा असा त्यांचा हिंसक अट्टहास देखील असतो. सांगायचे तात्पर्य मूळ हिंदू संस्कृती जगाच्या कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. एकीकडे जगभरातील दिग्गज कुंभमेळ्याला हजेरी लावत आहेत आणि दुसरीकडे आपल्या देशातील तरुण आई-वडिलांच्या लैंगिक जीवनावर टिप्पणी करत आहेत, खिल्ली उडवत आहेत. तर कुणी सारंग साठे नावाची व्यक्ती मंदिर वही बनाएंगे स्टॅण्ड अप कॉमेडीचा विषय म्हणून फालतू विनोद करत आहे. ज्या मंदिराच्या निर्माणासाठी अनेकांनी प्रणांची आहुती दिली, आपलाच हक्क आपल्याच देशात मिळवण्यासाठी सनदशीर मार्गाने, लोकशाही मार्गाने प्रतिकार करून मंदिर निर्माण केलं. अशा विषयावर विनोद करता येत नाही हे पुण्यातल्या साठेला का कळत नसावं? भारताचं प्रतिनिधित्व आजही ज्ञानेश्वर माउली करतात, हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज करतात, हिंदुसंघटक स्वा. सावरकर करतात, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर करतात आणि या महापुरुषांच्या मार्गावर चालणारे नमस्ते सदा वत्सले मातृभूमी ही प्रार्थना म्हणणारे प्रत्येक जण करतात...

कला, मनोरंजन अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्याचा जीवनाचा हा भाग आहे. नव्हे ही तर आपली संस्कृती आहे. कला आणि हिंदुत्व हातात हात घालून अनादी काळापासून सुखाने नांदत आहेत. आता काळाला अनुसरून त्यात बऱ्याचदा खट्याळपणा, खोडकरपणा येतोच. ज्यास वर्ज्य म्हणले जाते तेही कधीकधी डोकावते. पण प्रत्येक कलाकाराने आपली सीमा आखली पाहिजे. इंडियाज गॉट लेटेंट हा केवळ एक कार्यक्रम नाही तर ही संस्कृती (खरे तर विकृती) आहे. हे केवळ या एका कार्यक्रमापुरती मर्यादित नाही. तर हा वोक कल्चरचा एक छोटासा भाग आहे. तर या विकृत संस्कृतीच्या पाठीराख्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की 'इंडियाज गॉट पेशन्स'... पण पेशन्सलाही मर्यादा आहेत बरं का!

*आंगिकम भुवनम यस्य, वाचिकं सर्व वाङ्मयम*
*आहार्यं चन्द्र ताराधि, तं नुमः सात्विकं शिवम्* ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**हेमंत सालोडकर**

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ऑलिम्पिकचा पाया

उत्तरप्रदेशात महाकुंभ सुरू असतानाच त्याच्या शेजारी राज्यात उत्तराखंडमध्ये २८ जानेवारीपासून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा सुरू आहे. यात भारतातील सर्वच राज्यांनी भाग घेत आपली छाप सोडली आहे. सुमारे १८ दिवस चाललेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप १४ फेब्रुवारी रोजी झाला. यात क्रीडा नियंत्रण मंडळाने सर्वाधिक सुवर्ण पदके जिंकली असली तरी महाराष्ट्राने वेगळीच छाप या सोडली आहे. महाराष्ट्राने एकूण २०० पेक्षा जास्त पदके जिंकली आणि स्पर्धा संपेल तेव्हा महाराष्ट्राच्या आसपास कोणू पोहोचू शकणार नाही. इतकी पदकांची संख्या मोठी आहे. स्पर्धेच्या समारोपाला सुमारे दोन हजार व्हीआयपी आणि अडीच हजार व्हीव्हीआयपी उपस्थित होते. स्पर्धेचा यजमान उत्तराखंडने शेवटच्या दिवशी पदकांची शंभरी पूर्ण केली.

पूर्वीच्या काळात फक्त अभ्यास केल्याने आणि त्या आधारावर चांगली नोकरी मिळाली की मुलांचे आई-वडील धन्यता मानत होते. आमचा मुलगा बँकेत कॅशियर आहे, डॉक्टर, अभियंता आहे हे सांगताना पालकांची छाती फुगून जायची. त्यावेळी क्रीडा क्षेत्र नगण्य होते. पण मागील काही वर्षांत क्रीडाला अच्छे दिन आले आहेत. केंद्रातील भाजपा प्रणीत रालोआ सरकारने क्रीडाकडे विशेष लक्ष द्यायला सुरुवात केली आणि मुलांसह पालकांचाही क्रीडा क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. मागील काही वर्षांत अगदी ग्रामपंचायत स्तरापासून, तालुका, नगर, विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांना जणू उधाण आले आहे. त्यात गावपातळीवरील खेळाडू चमकू लागले आहेत. पण यासाठी पालकांची मानसिकता बदलणे गरजेचे होते. ते काम केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी मागील दहा वर्षांत केले. गावखेड्यातील मुलगा किंवा मुलगी यांच्यातील कलाकौशल्य हेरून त्याला पैलू पाडण्याचे काम सुरू आहे. यातून खेळाडू चांगले कौशल्य दाखवत आहे. त्याचप्रमाणे ठिकठिकाणी खासदार क्रीडा महोत्सव सुरू आहेत. नागपुरात तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संयोजनात असा महोत्सव मागील काही वर्षांपासून नियमित सुरू आहे. त्यात खेळाडू आपले कौशल्य दाखवतात. त्यांना मोठे बक्षीस देऊन प्रोत्साहन देण्यात येते. यामुळे खेळाडूंमध्ये क्रीडाविषयी सकारात्मक भावना निर्माण होऊन तो अजून परिश्रम करतो.

पूर्वी क्रीडा म्हणजे फक्त क्रिकेट हा समज होता. पण त्या खेळात खेळाडूंना सामावून घेण्याच्या मर्यादा होत्या. मग इतर खेळांकडे मुलांना वळवण्यासाठी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जाऊ लागल्या. त्यात विजयी खेळाडूंना घसघशीत पारतोषिक देण्यात येऊ लागले. यामुळे विद्यार्थ्यांना खेळाबद्दल आवड निर्माण झाली. सरकारनेही गल्ली ते दिल्लीपर्यंतच्या होतकरू खेळाडूंना हेरून त्यांना प्रोत्साहन देणे सुरू केले. आता तर कबड्डी, खो-खो च्या स्पर्धा मोठ्या प्रमाणात होत आहेत. यातून खेळाडूंचे आर्थिक उत्पन्न वाढल्याने त्यांच्या जीवनशैलीतही आमूलाग्र बदल झाला आहे. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन इतरही विद्यार्थी खेळाकडे वळत आहेत. पालकांचाही पाठिंबा मुलांना मिळत आहे. यात फक्त शहरीच नव्हे तर अगदी वनवासी मुलांनाही प्रोत्साहन देण्यात येत आहे. धनुर्विद्या क्रीडा प्रकारात त्यांची जास्त रुची असल्याने किंवा त्यांचे शरीर काटक असल्याने त्यांचे गुण विकसित करण्यात येऊन त्यांना तशा प्रकारच्या क्रीडा प्रकारात घेतले जात आहे. त्यांना मोठ्या स्पर्धांमध्ये सहभागी करून त्यांचा आर्थिक विकास करण्यात येत आहे. यामुळे त्यांची आणि त्याच्या कुटुंबाची आर्थिक उन्नती साधली जात आहे. फक्त राजकारण करण्यापेक्षा इतरही क्षेत्रांचा विकास करण्याचे धोरण केंद्र सरकारने आखले असल्याने अनेक जण क्रीडाकडे वळत आहेत. त्यासाठी लहानपणापासून विद्यार्थ्यांना घडविण्यात येते. परंपरागत शिक्षणासोबतच कौशल्ययुक्त शिक्षणही देण्यात येत असल्याचे विद्यार्थी मानसिकरीत्या सुदृढ होत आहे. यातूनच काही वर्षांनी होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत हेच खेळाडू भारताचा तिरंगा मानाने फडकवतील. पण यासाठी आतापासूनच त्याचा भक्कम पाया रचला जात आहे, ही चांगली गोष्ट आहे. आता तर भारताने २०३६ च्या ऑलिम्पिकसाठी यजमान म्हणून दावा केला आहे. त्यासाठी केंद्र सरकार, क्रीडा मंत्रालयाचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. यासाठी तेथे येणाऱ्या खेळाडूंना भौतिक सुविधा देता येतीलही, पण स्पर्धेत यजमान देश म्हणून भारताने पदकतालिकेत सन्मानजनक स्थान मिळवणे आवश्यक राहणार आहे. त्याचा मजबूत पाया राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांतून रचला जात आहे. अशा स्पर्धांतून अनेक मुले समोर येतील आणि ऑलिम्पिकमध्ये आपला, आपल्या गावाचा, शहराचा आणि देशाचा नावलौकिक करतील. ▮

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# बुडत्याचा पाय खोलात!

शरद पवारांच्या नादी संजय राऊत लागले आणि संजय राऊतांच्या नादी उद्धव ठाकरे लागले. ना संजय राऊतांना शरद पवार कळले, ना उद्धव ठाकरेंना संजय राऊत... एकमेकांच्या नादी लागून, वैयक्तिक स्वार्थापोटी निष्ठा, श्रद्धा आणि दैवतं बदलून ही मंडळी होत्याचं नव्हतं करून बसली. तेलही गेलं आणि तूपही... अशी यांची आजची अवस्था आहे. महाराष्ट्र आणि देशातील मोठमोठे पक्ष आणि त्यांच्या नेत्यांना अफूची गोळी देत महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि देशपातळीवर इंडिया आघाडी करणारे महामहिम शरदचंद्र पवार साहेब होते. यांच्या नादी लागून काही लोकांनी अर्थात दिल्लीत अरविंद केजरीवाल, राहुल गांधी, उत्तर प्रदेशात अखिलेश यादव, बिहारमध्ये लालू प्रसाद यादव, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी अशा सगळ्या मंडळींनी आणि महाराष्ट्राचंच सांगायचं झालं तर, उद्धव ठाकरे ॲण्ड कंपनीने केंद्र सरकार, पंतप्रधान, मोदी-शाह यांच्या नावानं शिमगा केला, प्रचंड अकांडतांडव केला. पण अफूची गोळी देणारे 'वशीकरण बाबा'ने मात्र, आपली 'बॅकडोअर डिप्लोमसी' व्यवस्थित सुरू ठेवली.

'वशीकरण बाबा'च्या गोळीचा प्रभाव उद्धव ठाकरे ॲण्ड कंपनीवर थोडा जास्त झाला. त्यांनी भाजपा, पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्याविषयी पातळी तर सोडलीच मात्र, आता तर ज्यांनी २०१४ मध्ये यांची लाज वाचविली त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी वाळवीसारखा शब्दप्रयोग करून सीमाच ओलांडली. पक्ष गेला, चिन्ह गेलं, महाराष्ट्राने नाकारलं अशी परिस्थिती असताना, 'सुंभ जळला तरी पीळ' मात्र कायम असल्यागत यांचं झालं आहे. प्रत्यक्षात भाजपाने फाट्यावर मारले असले तरी, थोड्याअधिक प्रमाणात पुनर्वसन होण्यासाठी चुंचू प्रवेशाची शक्यता संघाच्या मध्यस्थीने कायम होती. पण काहीही बरळून स्वतःच्याच पायावर धोंडा मारून घेणाऱ्या ठाकरे ॲण्ड कंपनीची 'बुडत्याचे पाय खोलात' अशी अवस्था आजघडीला झाली आहे.

मुळात राज्यात एकमेव प्रादेशिक पक्ष आपलाच असला पाहिजे यासाठी गेली ३४ वर्षे प्रयत्नात असणाऱ्या शरद पवारांनी २०१९ मध्ये खेळी खेळली आणि शिवसेनेला मुख्यमंत्रिपदाचं हाडूक दाखवून, त्यांच्या अधःपतनाची पक्की व्यवस्था केली. शिवसेना संपली तर, केवळ महाराष्ट्रात एकमेव आपलाच पक्ष असेल, असा त्यामागचा पवारांचा कुटिल डाव होता. या सापळ्यात शिवसेना अर्थात उद्धव ठाकरे अलगद अडकले. त्यासाठी शरद पवारांनी संजय राऊत नावाच्या प्याद्याचा योग्य प्रकारे वापर केला. सगळे फासे व्यवस्थितच पडत होते. मात्र, पवारांनी पडद्यामागे भाजपालाही खेळवत ठेवून, ऐनवेळी दगा दिल्यानं सारा खेळ फसला. आता काय शिवसेना संपविण्याच्या नादात साहेब आपलाही पक्ष, चिन्ह, नेते, कार्यकर्ते गमावून बसले आणि राष्ट्रीय पक्षाची मान्यता देखील हातची गेली. असे असले तरी, साहेब मात्र, मुत्सद्दी राजकारणी आहेत. त्यांनी पुन्हा कमबॅक करण्याच्या हालचाली सुरू ठेवल्या आहेत. त्यांचे दरवाजे उघडे आहेत. पण त्याचवेळी साहेबांनी ठाकरेंसाठी सर्व दरवाजे आणि मार्ग बंद होण्याची पुरेपूर व्यवस्था करून ठेवली आहे.

आता जुन्या घडामोडींचा ऊहापोह आज का? तर, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दिल्लीत मराठा पातशाहीचे धुरंधर नेतृत्व महादजी शिंदे यांच्या नावाने राष्ट्र गौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. आणि महत्त्वाची, काही लोकांना मिरची झोंबणारी घटना म्हणजे, शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. त्यानंतर ठाकरे ॲण्ड कंपनीचा झालेला जळफळाट अवघ्या महाराष्ट्राने बघितला. ज्यांच्या जिवावर मुख्यमंत्रिपद उपभोगले आता त्यांच्यावरही विश्वासघातकीसारखे शब्द वापरून तोंडसुख घेण्यात जगातील बेस्ट सीएमचा घरगडी असलेल्या विश्वप्रवक्त्याने तसूभरही वेळ घालवला नाही. त्यामुळे ठाकरे ॲण्ड कंपनी 'ज्याचं खाईल, त्याचंच गाईल...' हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.


काहीही असले तरी, एकनाथ शिंदेंच्या या सत्काराच्या निमित्ताने राज्यातील राजकारण तापले. विशेष म्हणजे महाविकास आघाडीत ठिणगी पडली. आणि त्यावरून पुन्हा शाब्दिक युद्ध रंगले. मग काय बोलघेवडे केवळ राऊतच आहेत अशातला भाग थोडी आहे. त्यांच्यापेक्षा एक पाऊल पुढे असलेले बोलघेवडे शरद पवारांकडेदेखील आहेत. मग त्यातल्या एका, अर्थात जितेंद्र आव्हाड नावाच्या बोलघेवड्याने संजय राऊतांना खडेबोल सुनावले. शब्द जरा जपून वापरा... विश्वासघातकी वगैरे खपवून घेणार नाही, अशा शब्दांत खडसावले. बरं पवारांच्या शिलेदाराने राऊतांचा समाचार घेतला तो घेतलाच. मात्र, आश्चर्याची गोष्ट म्हणजे ठाकरे गटाचे माजी आमदार वैभव नाईकांनी देखील राऊतांचा क्लास घेतला. शरद पवार हे चार वेळा मुख्यमंत्री झाले. कसे झाले, काय झाले, हे अवघ्या महाराष्ट्राला माहिती आहे. त्यांचा राजकीय प्रवास, पृष्ठभूमी, राजकीय खेळ्या सर्वश्रुत आहेत. हे काय महाविकास आघाडी तयार करण्याआधी माहिती नव्हतं? आता थयथयाट करून काय उपयोग आहे? अशा शब्दांत नाईकांनी संजय राऊतांना घरचा आहेर दिला. आता 'ना घर का ना घाटका' अशी अवस्था असणाऱ्या उद्धव ठाकरेंना भाजपाशी फारकत घेण्याची वेळ आणणाऱ्या शरद पवारांशी वाकडं घेऊन राजकारणात एकटे पडण्याची वेळ राऊतांमुळे आली आहे. भाजपाशी तुटलं, संघाशी स्वतःहून खाजवलं, पवारांना खिजवलं आणि काँग्रेससोबत वाजलं, ही जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याला कारणीभूत उद्धव ठाकरे स्वतः असून, त्यांना खतपाणी घालणारे राऊत आहेत.

कोण, कोण कोणाला टोप्या घालत आहे आणि टोप्या उडवत आहे, हेच काही कळेनासं झालं आहे. कोण गुगली टाकत आहे, हेदेखील कळत नाही आहे. हे उद्विग्न विधान आहे विश्वप्रवक्ते राऊत साहेबांचे... यांच्या खुर्चीला सुरुंग लावून, लंका पेटविणाऱ्याचा सन्मान करून, उलट महाराष्ट्राला समोर नेण्याचं उत्तम कार्य केल्याचे गौरवोद्गार काढल्यानंतर, २०१९ मध्ये टाकलेली टोपी, गुगली आदींचं स्मरण आता झालेलं दिसत आहे. मात्र, राऊतांच्या टोप्या घालण्याच्या विधानाला उद्धव ठाकरेंनी गंभीरतेने घेतल्यास पुढील प्रवास सुखाचा होईल. ▮

९२७०३३३८८६

### ध्वनिप्रदूषणाचे भान असावे!

सध्या स्टेट, सीबीएसई आणि तत्सम बोर्डाच्या दहावी आणि बारावीच्या काही परीक्षा सुरू झाल्यात व काही परीक्षा सुरू होणार आहेत. विद्यार्थ्यांच्या करीअरमध्ये या परीक्षा अत्यंत महत्त्वाच्या असतात. जीवनात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी मदत करतात. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी दोन तीन वर्षे सातत्याने मेहनत घेतलेली असते. या दृष्टीने अशा संवेदनशील काळात व्यवस्थित अभ्यासासाठी वातावरण निर्मिती सुद्धा आवश्यक आहे. घरात अशी परिस्थिती नियंत्रणात ठेवता येते परंतु बाहेरील नियंत्रणासाठी प्रशासन आणि समाजाचीही गरज आहे. विशेषकरून ध्वनिप्रदूषण होणार नाही, कार्यक्रमांत आवाजाची तसेच वेळेची मर्यादा राखण्यासाठी काळजी घेतली गेली पाहिजे. संबंधित प्रशासन खासकरून स्थानिक पोलिस विभागास नम्र विनंती आहे की त्यांनी ध्वनिप्रदूषणावर नियंत्रणासाठी आवश्यक ते जाहीर प्रगटन करावे आणि याबाबत कडक सूचना द्याव्यात. समाजातील घटकांनी सुद्धा यास सकारात्मक प्रतिसाद द्यावा ही विनंती. परीक्षेपुरतेच नव्हे तर नेहमीसाठीच आवाजाची तीव्रता मर्यादित असल्यास उत्तमच, याचा सर्वांनाच फायदा होईल.



**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

●● ●●

### अतिक्रमणाच्या विळख्यात नागनदी

नाग नदीच्या दोन्ही बाजूंनी मागील दहा वर्षांत दुप्पट प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. नदीच्या प्रवाहात अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. नाग नदीवरील सर्वच अतिक्रमणांचा तातडीने निपटारा करण्यात यावा, असा न्यायालयाचा स्पष्ट निर्देश असताना याकडे सातत्याने कानाडोळा होत आहे.

नदीच्या पात्रात सिमेंट कॉलम टाकून अनधिकृत बांधकाम व काठावर बेकायदेशीर झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत त्यामुळे नाग नदीचा प्रवाह अरुंद झाला आहे. या कारणांमुळे पावसाळ्यात पूरस्थिती कायम राहून पुरामुळे रहिवाशांचे नुकसान होऊ शकते. नदीपात्रातील बेकायदेशीर झोपडपट्ट्या हटविण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येतो. उच्च न्यायालय तत्काळ कारवाईचा आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देते, परंतु काही दिवसांत जैसे थे स्थिती निर्माण होते. ७ फेब्रुवारीपासून नाग नदी, पिवळी नदी व पोहरा नदी स्वच्छ करण्याच्या कामांना सुरुवात होणार होती. या नदी स्वच्छता कार्यक्रमांतर्गत नदीतील केवळ गाळ काढणे एवढेच काम करण्याचे ठरलेले असते असे वाटते. पावसाळ्यात येणाऱ्या पुरामुळे हे गाळ काढण्याचे काम वाया गेलेले आपल्याला दरवर्षी दिसते. पावसाळ्यात येणारे पुराचे पाणी नदीतून योग्यरीत्या वाहून जाण्याकरिता नदीला आवश्यक तो आकार देणे गरजेचे आहे, पण याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे असे दिसते. अतिक्रमणाचा प्रश्न केवळ नदीपात्राचा नसून पदपथांवर सुद्धा अतिक्रमण झालेले आहे. या दोन्ही ठिकाणी होणाऱ्या अतिक्रमणाबाबत, अतिक्रमण होण्यापूर्वीच मनपा का काळजी घेत नाही, हा मोठा प्रश्न आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

●● ●●

### विविध ओळखपत्रांमधील चुका आणि ज्येष्ठांची गैरसोय

आज भारतात प्रत्येक कार्यालयीन कामासाठी ओळखीचा पुरावा आवश्यक आहे आणि त्यासाठी आपण रेशन कार्ड, आधार, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, पासपोर्ट, जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता, अधिवास, जन्म प्रमाणपत्र इत्यादींचा वापर करतो. साधारणपणे नाव, वडिलांचे नाव, आडनाव, पत्ता, फोन, ईमेल यामध्ये चुका आढळतात. आयडी इ. प्रत्येक कागदपत्र एकमेकांशी संबंधित गोष्टींशी जुळले पाहिजे. परंतु चुका झाल्यामुळे कोणत्याही गोष्टीत विसंगती आढळून आल्याने नागरिकांना समस्या भेडसावत आहे. ते त्यांचे अधिकृत काम त्वरित करू शकत नाहीत, विशेषत: ज्येष्ठ नागरिकांना समस्या आणि आव्हानांना सामोरे जावे लागते कारण त्यांचे वय, आजारपण, अशक्त पणा यामुळे ते सहन करू शकत नाहीत. कारण त्यांच्यासाठी दस्तावेज आवश्यक असल्याने त्यांना धावपळ करावी लागते. त्यामुळे दस्तावेजात अचूकता आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने यावर काम करणे आवश्यक आहे. आणि प्रथम ठिकाणी चुका टाळण्यासाठी उपाय आणणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांचा आणि सरकारी अधिकाऱ्यांचाही वेळ वाचणार आहे.

विशेषत: केंद्र आणि राज्य सरकारला विनंती आहे की चुका होऊ नयेत जेणेकरून नंतर नागरिकांना बदलासाठी धावपळ करण्याची गरज पडणार नाही. कृपया ज्यांना याबाबत अधिकार आहेत त्यांनी त्याची दखल घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी. ▮

**गणेश शेवते**/९०९६१५२९४९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## पोलिसांच्या अवैध रेती उपसावरील कारवायांच्या धास्तीने

# बिहारी टोळ्यांनी धरला घरचा रस्ता

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ फेब्रुवारी**

मागील पंधरवाड्या पासून जिल्हा पोलिस दलाच्या वतीने अवैध वाळु उपसा, वाहतुकीविरोधात कारवाई सुरू आहे. नदी पात्र परिसरात फिरणाऱ्यांना बिहारी मजुरांना लाठीचा प्रसाद देखील देण्यात येत असल्याने रेती उपसासाठी आलेले परप्रांतातील मजूर परतीच्या वाटेला लागले आहेत. मागील दोन दिवसात बहुतांश बिहारी टोळ्या नांदेड सोडून गेल्या आहेत तर काही परतीच्या वाटेवर आहेत.



राज्यात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळु उपसा वाहतुक सुरू असल्यामुळे या अवैध उपसाची दखल वरिष्ठ पातळीवर घेण्यात आली असून ठिकठिकाणी कारवाई सुरू आहे. त्याच पद्धतीने नांदेड जिल्हा पोलिस दलाच्या वतीने देखील मागील पंधरवाड्यापासून जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाणे तहसीलच्या मदतीने कारवाई करत आहे. या कारवाईत पोलिसांनी कोट्यावधी रुपयांचे साहित्य जप्त केले असून अनेकांवर गुन्हे दाखल केले आहेत. केवळ वाहन चालकांवरच गुन्हे दाखल करण्यात आले असले तरी या कारवाईसत्राचा धसका रेती माफियांसह बिहार मजुरांनी घेतला असून अवैधरित्या होणारी वाळु उपसा व वाहतुक बऱ्याच प्रमाणात बंद झाली आहे. त्यामुळे वाळु उपसासाठी परप्रांतातून आलेल्या मजुरांना काम नसल्याने त्यांनी आता परतीची वाट धरली आहे. काम नाही त्यातच एखादा परप्रांतीय मजुर नदी पात्र परिसरात भेटल्यास त्याला पोलिसांकडुन ‘प्रसाद’ मिळत असल्याने अनेकांनी नांदेड सोडणेच पसंत केले आहे. मागील दोन दिवसापासून बिहारी मजुरांनी घरची वाट धरली आहे. अनेक बिहारी टोळ्या नांदेड सोडून गेल्या आहेत तर काही टोळ्या पुन्हा रेती उपसा सुरू होईल या आशेने नांदेडातच तळ ठोकुन आहेत. या बिहारी टोळ्यांना प्रत्येकी १ गाडी १ हजार रुपये देण्यात येतात. एका टोळीत ५ ते ७ मजुरांचा समावेश असतो तर ही टोळी एका रात्रीतून १५ ते २० गाड्या भरते. मोठ्या प्रमाणात उपसा होत असल्याने अनेक परप्रांतिय मजुरांनी नांदेडची वाट धरली होती. परंतू पोलिसांनी कारवाईसत्र सुरू करताच या बिहारी टोळ्यांनी पुन्हा घरची वाट धरली आहे.

**रेती माफियांचा ‘मॅजिक’**

पोलिस दलाच्या वतीने मागील पंधरा दिवसापासून कारवाई सुरू असल्याने वाळु उपसा, वाहतुक बंद आहे. ४०७ टिप्पर व हायवाच्या माध्यमातून होणारी रेती वाहतुक बंद झाली असली तरी पोलिसांच्या डोळ्यात धुळफेक करत काही रेती माफिया रेती वाहतुकीसाठी छोटा हत्ती मॅजिक वाहनांचा वापर करत असून पोलिसांनी रेती माफियांच्या ‘मॅजिक’कडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

## आदिवासी युवकांना रोजगारासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यास शासन कटीबद्ध : उईके



**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १५ फेब्रुवारी**

राज्यातील १३ जिल्हे पेसा कायद्याअंतर्गत समाविष्ठ आहेत त्या अंतर्गत आदिवासी प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी विकास कार्यक्रम राबविण्यात येतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवस कृतीकार्यक्रमांतर्गत दिनांक ७ फेब्रुवारी रोजी त्या त्या विभागातील मंत्री, जिल्हाधिकारी, प्रकल्प अधिकारी तसेच संबंधित सर्वोच्च अधिकारी यांनी एक दिवसाचा मुक्काम केला त्यांच्या अहवालानुसार आश्रमशाळेत अत्यावशक भौतिक व शैक्षणिक सुविधा तात्काळ उपलब्ध करून दिल्या जातील तसेच राज्यातील बेरोजगार आदिवासी युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने विविध योजना आखल्या असून त्याची लवकरच अंमलबजावणी करण्यात येईल अशी माहिती राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या संकल्पनेतुन १०० दिवस कृती आराखडा संकल्पने अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट येथिल लाभार्थी, अधिकारी व कर्मचारी यांच्या सोबत बैठक व आढावा घेण्याच्या दृष्टीने ते दि १५ फेब्रुवारी रोजी किनवट दौ-यावर आले असताना गोकुंदा येथील शासकीय विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

त्यांनी सांगितले कि, राज्यातील १३ जिल्हे पेसा कायद्या अंतर्गत समाविष्ठ आहेत. त्या अंतर्गत आदिवासी प्रकल्प कार्यालया मार्फत आदिवासी विकास कार्यक्रम राबविण्यात येतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या १०० दिवस कृती कार्यक्रमा अंतर्गत दिनांक ७ फेब्रुवारी रोजी राज्यातील ४९७ आश्रमशाळांमध्ये त्या त्या विभागातील मंत्री, जिल्हाधिकारी, प्रकल्प अधिकारी, संबधित सर्वोच्च अधिकारी यांनी एक दिवसाचा मुक्काम केलेला होता. राज्यातील बेरोजगार आदिवासी युवकांना रोजगार उपलब्ध व्हावे या करिता विविध योजना आखल्या असुन त्या लवकरच अमलात येतील तर बेरोजगार आदिवासी युवकांना व्यवसाया करिता अर्थसहाय्या करण्याच्या योजना ही अमलात आणल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

किनवट तालुक्यासह राज्यातील आदिवासी महिलांवरील अत्याचाराच्या घटनांसंदर्भात त्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी स्पष्ट केले कि, राज्याचे सरकार हे आदिवासी महिला असो किंवा कोणत्याही संवर्गातील महिला असो त्यांच्या सुरक्षे संदर्भात अत्यंत संवेदशिन असुन महिलांवरील अत्याचाराचे प्रकरण जलदगती न्यायालयात चालऊन आरोपीना कठोर शासन केले जाईल. या करिता सर्व संबधित विभागांना तत्काळ कृती करण्याच्या सुचना देण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आश्रमशाळेतील कर्मचा-यांना निवासाची व्यवस्था केलेली असते परंतु ज्या कर्मचा-यांना निवासाची व्यवस्था नसते व ते कर्मचारी त्यांच्या अपेक्षित कार्यालयीन वेळेत उपस्थित राहत नसेल अशांवर कारवाई करण्यात येईल. आपली वेळेत सेवा बजावुन मग तो कर्मचारी काय करतो हा त्याचा वैयक्तीक प्रश्न असल्याचे उईके म्हणाले.

यावेळी त्यांनी एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाला भेट दिली व त्यानंतर भारतीय जनता पक्षाचा संघटनात्कम आढावा घेऊन पदाधिका-यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी किनवट शहरातील राष्ट्रीय स्वंयसेवक कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या सोबत किनवट विधानसभेचे आमदार भिमराव केराम, हदगावचे आमदार बाबुराव कोहळीकर यांच्यासह भाजपा, शिवसेना, महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### रातोळी येथील श्री रोकडेश्वराची यात्रा विविध उपक्रमांनी उत्साहात

**नायगांव**-तालुक्यातील रातोळी येथील सकल ग्रामस्थांचे ग्रामदैवत श्री.रोकडेश्वर मंदिराच्या यात्रेची १६६ वर्षापूर्वीपासून परंपरा ही कायम ठेवत. यंदाची यात्रा विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. श्री रोकडेश्वर यात्रेच्या निमित्ताने पालखी मिरवणूक, नयनरम्य आतिषबाजी,व जंगी कुस्त्यांचे सामने, कला महोत्सव विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मेजवानीसह पार पडली . दि. १४ रोजी श्री रोकडेश्वर कला मंचावर सांस्कृतिक कला महोत्सव सोहळा पार पडला. या वेळी नायगांव, मुखेड तालुक्यातील विवीध शाळेतील मुला - मुलींनी मराठी, हिंदी गाण्यांच्या ठेक्यावर नृत्याचे सादरीकरण करुन रसिक श्रोत्यांची मने जिंकली असून. यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थीत होता श्री रोकडेश्वर कला मंचावर सांस्कृतिक कलेचे सादरी करण करणाऱ्या सर्व कलावंताचे श्री रोकडेश्वर यात्रा महोत्सव कमिटीच्या वतीने सन्मान प्रमाणपत्र ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.यंदाच्या वर्षातील श्री.रोकडेश्वराची यात्रा यशस्वी करण्यासाठी यात्रा समितीचे अध्यक्ष शिवराज रातोळीकर,माजी सरपंच विश्वांभर रातोळीकर,नंदू रातोळी कर, तूकाराम गोविंद रातोळीकर,संदीप रातोळीकर, साहेब राव रातोळीकर, अंकूश रातोळीकर, सरपंच प्रतीनिधी राहुल रातोळीकर, बी.जी.रातोळीकर, व्यंकटराव टाकळे रातोळीकर, डॉ.शिवसांब चिद्रे , हाणमंत रातोळीकर, जे.डी. रातोळीकर, अरुण रातोळीकर,विजय रातोळीकर, हाणमंत रातोळीकर, विजय रातोळीकर,शिवाजी लूगारे सह अनेक गांवकरी मंडळीने मोलाचे परीश्रम घेऊन ही यात्रा यशस्वी केले आहे. रातोळी येथील श्री रोकडेश्वर यात्रेच्या निमित्ताने श्री रोकडेश्वर कला मंचावर सांस्कृतिक कलेचे सादरी करण करुन सर्व प्रथम क्रमांक मिळविलेल्या कलाकाराचे यात्रा समितीच्या वतीने सन्मान प्रमाण पत्र व ट्राफी देऊन सन्मानित करण्यात आले.


### संत रविदास महाराज जयंती उत्साहात

**माहूर**-भारतीय संत आणि कवी संत शिरोमणि संत गुरु या उपाधीने ओळखले जाणारे संत रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती अ.भा.



गुरु रविदास समता परिषद शाखा,माहूरच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संघटनेच्या संपर्क कार्यालयात अनेक अनुयायी तसेच सर्वधर्मीय प्रतिष्ठित मान्यवर नागरीकांच्या उपस्थितीत अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात येऊन विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तथा संत रविदास महाराज यांच्या प्रतीमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजप ओबीसी प्रदेश सचिव अनिल वाघमारे, उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड, भाजपाचे ज्येष्ठ नेते नंदकुमार जोशी,पं.स.माजी सभापती वसंतराव कपाटे, शिवसेना (उबाठा) श.प्र.निरधारी जाधव,अ.भा.गुरु रविदास समता परिषद (ग्रामीण) जिल्हा उपाध्यक्ष संजय बनसोडे, अ.भा. गुरु रविदास समता परिषदेचे तालुकाध्यक्ष ड.नितेश बनसोडे, माजी नगरसेवक इलियास बावानी, राज ठाकूर, अमृत जगताप, मारोती कांबळे, चंद्रकांत देवरसे, प्रवीण कांबळे, नां. जि.म. सहकारी बँकेचे सेक्रेटरी संजय वांगे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

### मरवाळी तांडा ग्रामपंचायतीसह आश्रम शाळेत संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी



**नायगाव**-तालुक्यातील मरवाळी तांड्यासह माध्यमिक आश्रम शाळेत संत सेवालाल महाराजांची २८६ वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. नायगांव तालुक्यातील मरवाळी तांड्या सह येथील माध्यमिक आश्रम शाळेत दि.१५ रोज शनिवारी सकाळी शाळेच्या भव्य प्रांगणात सर्व प्रथम प्राचार्य विजय कुमार देशमुख,सुर्यकांत जाधव,नामदेव राठोड शिवराम राठोड यांनी बंजारा समाजाचे आराध्य दैवत तथा थोर विचारवंत संत सेवा लाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तद्नंतर प्राथमिक चे नागोराव चव्हाण,एकनाथ मुनगीलवार, साहेबराव येवरे, सुभाष राठोड , सुभाष कदम , माधवराव वाघमारे, गणेश मारताळेकर आनंदराव सूर्यवंशी, दिपक बि-हाडे, उत्तम राठोड, सचिन राठोड सह, आदि शिक्षक वृंदानी सामुहिक पणे बंजारा समाजाचे समाज सुधारक, संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्प अर्पण करुन अभिवादन करीत २८६ वी जयंती साजरी करण्यात आली. तर यावेळी पोष्ट बेसिक ज्यू.कॉलेज चे प्राध्यापक अवचित शेजूळ यांनी उपस्थित विद्यार्थ्या समोर बंजारा समाजाचे आराध्य दैवत अंधश्रद्धा अनिष्ट रूढी परंपरा विरुद्ध समाज प्रबोधन करणारे थोर विचार वंत समता, न्याय, बंधुतावादी विचारांचे उदगाते, संत सेवालाल महाराजांच्या जिवन पैलूवर आपले मनोगत व्यक्त केले आहे. यावेळी नागनाथ येल्लूरे, संभाजी मेहेत्रे, धोंडिबा तेलंग, बालाजी राठोड, लक्ष्मण चव्हाण चिलमवाडसह आदि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘चार साहिबजादे सिख युथ फेस्टीव्हल’च्या अकाराव्या स्पर्धेची जय्यत तयारी सुरू

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ फेब्रुवारी**

सिख एज्युकेशन वेलफेअर असोसिएशन चे अध्यक्ष जरनैलसिंघ भुजगसिंघ गाडीवाले यांच्या वतीने आजोयित सिख युथ फेस्टीव्हल ची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

सिख एज्युकेशन वेलफेअर असोसिएशन सेवा संस्थेच्या वतीने गेल्या दहा वर्षापासुन निरतंर पणे सिख युथ युथ फेस्टीव्हल चे आयोजन केले जाते हा आयोजन श्री गुरु गोंविदसिंगजी यांचे चार पुत्र (अर्थात) चार साहिबजादे यांनी मानवतेसाठी आणी अधर्माच्या विरोधात लढत असताना दिलेल्या बलिदानाच्या पावन स्मृतीमध्ये सिख युथ फेस्टीव्हलच्या नावाने कार्यक्रम पार पडतो. यंदाचा आयोजनाचा हा आकरावा वर्ष असुन १९ ते २० फेब्रुवारी २०२५ दरमान्य अशा दोन दिवशीय स्पर्धाचे आयोजनाचे खालसा हायस्कुल मैदानावर जय्यत तयारी सुरू असल्याचे माहिती कार्याक्रमाचे आयोजन जर्नलसिंघ भुजगसिंघ गाडीवाले यांनी दिली आहे. या कार्याक्रमचा उद्घाटन संमारभ १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.३० वा होणार तर बक्षीस वितरण कार्याक्रम तारीख २० फेब्रुवारी २०२५ रोजी सांय ४.३० वा. होणार आहे. या क्रर्याक्रमाचे उद्घाटन व बक्षीस संमारभ संत महापुरुष व विविध पक्षातील जेष्ठ नेते, अधिकारी मान्यवर, व जेष्ठ नागरीक यांच्या शुभ हस्ते होणार आहे. या आयोजनामध्ये पगडी बांधणे, गुरुवाणी कंठ, हॉकी, व्हीलीबॉल, बॅटमिटन अश्याप्रकारे धार्मिक व खेळ स्पर्धा युवक व युवती साठी पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या स्थानाला दिवाण तोडरमल जैन असे नाव देण्यात येत आहे अशी माहिती सुध्दा गाडीवाले यांनी दिली आहे. तसेच या कार्यक्रमाला युवक व युवतीनी जास्ती जास्त संख्येने सहभाग घ्यावे. असे आव्हान कार्यक्रमाचे आयोजक व संस्थेचे अध्यक्ष जरनैलसिंघ भुंजगसिंघ गाडीवाले यांनी केले आहे.

## हाणेगाव येथे संत सेवालाल महाराज जंयती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हाणेगाव,दि. १५ फेब्रुवारी**

दि.१५ रोजी बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांच्या २८६ व्या जयंतीनिमित्त समाजसेवक संजय आनंदराव चव्हाण यांच्याकडून असलम शेख यांच्यातर्फे जि.प.हायस्कुल,कन्या शाळा,स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे जिलेबी वाटप करण्यात आले यावेळी असंख्य विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतले आहे तर आनेकांनी या कार्याच कौतुक ही केले आहे.

## संत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त शिवपुराण कथेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**निवघा बाजार,दि. १५ फेब्रुवारी**

श्री गजानन महाराज मंदिर संस्थान चक्री व समस्त गावकरी मंडळी चक्री ता. हदगाव यांच्या वतीने श्री संत गजानन महाराज शेगाव यांच्या १४७ व्या प्रकट दिनानिमित्त व चक्री येथील श्रींच्या मूर्ती प्रतिष्ठापना वर्धापन दिनानिमित्त हदगाव तालुक्यातील मौजे चक्री येथे समस्त गावकरी मंडळीच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री गजानन विजय ग्रंथ व्यासपीठ नेतृत्व ह. भ. प. अनिताताई सुर्यवंशी पाटील चक्रीकर तर शिवपुराण कथेचे वाचन पांडुरंग महाराज दिवटपिंप्रीकर यांच्या सुमधुर वाणीतून होणार आहे. परिसरातील सर्व भाविकभक्तांनी साप्तहात आयोजित सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी चक्री यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## विविध मागण्यांसाठी लाइनस्टाफ कर्मचाऱ्यांचे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ फेब्रुवारी**

इलेक्ट्रिसिटी लाईनस्टाफ असोसिएशनतर्फे महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ कामगारांचे सुरक्षित साधने मिळण्याकरिता व प्रलंबित ज्वलंत प्रश्न निकाली काढण्याकरिता सोमवार, १० फेब्रुवारी विभागीय कार्यालयासमोर द्वारसभा, निदर्शने करण्यात आली.


महाराष्ट्र राज्यात प्रत्येक घरात वीज पोहोचविण्याचे कार्य महावितरण कंपनीतील आपल्या सर्वांच्या संपर्कातील तळागाळात कार्यरत असणारे लाईनस्टाफ (लाईनमन) कामगार आहेत. आता याच तळागाळात कार्यरत असणाऱ्या कामगारांवर अन्याय होत आहे. मागील अनेक वर्षापासून त्यांना दैनंदिन लागणारी सुरक्ष साधाने त्यांना व्यवस्थित मिळत नाहीत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात महावितरण अंतर्गत दरवर्षी हजारो अपघात होतात त्यात मोठ्या प्रमाणात लाईनस्टाफ कामगारांचे अपघात होऊन मृत्यू होत आहे. यासह अनेक ज्वलंत प्रश्नाबाबत ठोस निर्णय अद्याप महावितरण प्रशासन तसेच ऊर्जा मंत्री यांच्याकडे प्रलंबित आहे त्यामुळे या श्रेणीवर अन्याय होत असल्याने लाइनस्टाफ राज्यभरात सोमवारपासून आंदोलना सुरू गेले आहेत. त्याच अनुषंगाने नांदेड विद्युत भवन समोर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात झोन अध्यक्ष ईश्वर सिंघ टेलर, झोन सचिव मोहन सिंग जांगडे, साईनाथ जाधव, दत्ता गाडेकर, प्रियंका सूर्यतळे, विद्या डेरणासे, विश्वदीप वाघमारे,गजानन कुरुडे, कैलाश राऊत,जाकीर अली शेख, वैभव मोरे, यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

## आरिफ तांबोळीची महसूल सहाय्यक पदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ फेब्रुवारी**

मुखेड तालुक्यातील ग्राम चांडोळा येथील रहिवासी तथा सर्वसामान्य कुटुंबातील आरिफ मोहियोद्दीन तांबोळी याची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या महाराष्ट्र सेवा गट-क सन २०२३ सालातील परीक्षेतून महसूल सहाय्यक पदी निवड झाली आहे. नुकताच एमपीएससी गट-क मुख्य परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्तेची निवड यादी संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली.त्यात चांडोळा येथील होतकरू तरूणाने भरारी घेतल्याचा निकाल हाती आला.येथील किरकोळ व्यापारी मोहियोद्दीन तांबोळी यांचे हे कनिष्ठ सुपूत्र आहेत.यांनी मिळेल तो व्यवसाय करीत आपल्या मुलास पुणे येथे पाठवले होते. काही वर्षांपासून पूर्व परीक्षा,मुख्य परीक्षा अशी धडपड आरिफची कष्टदायी राहिली आहे.

## सरसम येथे भिमाई जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. १५ फेब्रुवारी**

हिमायतनगर तालुक्यातील मौजे सरसम ( बु) येथे दिनांक १४ फेब्रुवारी रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव,विश्वरत्न,बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आई माता भिमाई रामजी आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम माता भिमाई रामजी आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. माता भिमाई यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला. जे स्वातंत्र्य,समता, बंधुता आणि एवढे सुख सुविधा प्राप्त झाल्या आहेत. ते म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच झाल्या आहेत. आणि या थोर समाजसुधारकाला जन्म देणाऱ्या माता भिमाई यांच्यामुळेच आपल्याला हे सर्व मिळाले आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे पिता रामजी आंबेडकर व त्यांच्या परिवाराला सांभाळणाऱ्या तसेच लेकरा बाळांवर योग्य ते संस्कार करणाऱ्या माता भीमाईच होत्या. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मानंतर अवघ्या पाच वर्षातच त्यांचा मृत्यू झाला.त्यांनी त्यांचे जीवन आंबेडकर घराण्यासाठी अहोरात्र झिजविले.यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जन्म देणाऱ्या भीमाईचे कार्य समाजाने विसरता कामा नये.आजच्या माता माऊल्यांनी माता भीमाईचा आदर्श घ्यावा. यावेळी रुपाली कांबळे, संघप्रिया कवडे, आम्रपाली नगराळे, माजी सरपंच शेषेकला नगराळे, बालाजी कांबळे, मायावती कांबळे, कमलबाई कांबळे, वंदना नगराळे, संजय वाठोरे, विजय वाठोरे, सरस्वताबाई कांबळे, प्रभावती कांबळे, राजू नगराळे, अमन नगराळे, दिशांत कांबळे, दक्ष कवडे यासह अनेक जन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध नागरी सुविधांसाठी काँग्रेसचे नगर परिषदेला निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १५ फेब्रुवारी**

मुदखेड नगर परिषदेची मागील काही वर्षांपासून निवडणूक न झाल्याने सध्या नगर परिषदेवर प्रशासक राज असून गत काळात नगर परिषदेने काही जाचक अटी व नियम भारतीय राज्य घटनेने दिलेल्या विशेष अधिकारा अन्वये लागू करण्यात आले आणि शहरात सार्वजनिक ठिकाणी नागरी सुविधा उपलब्ध नसून सामान्य नागरिकांना सुविधेचा अभाव होत असून नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागतो करिता काँग्रेस पक्षाने दिनाक १२ फेब्रुवारी रोजी निवेदन सादर करत मालमत्तेवरील थकीत बाकीवर २४% टक्के व्याजदर कपाती जाचक अटी व नियम रद्दबातल करण्यात यावे आणि सार्वजनिक ठिकाणी नागरी सुविधा प्रदान करण्यात यावी अशी मागणी देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



यावेळी नगरपरिषदेचे कार्यालयीन अध्यक्ष मोहम्मद अजीमुद्दीन यांनी निवेदन स्वीकारले.

मुदखेड नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या जनतेच्या मालमत्तेच्या थकीत बाकींवर २४ टक्के व्याजदर आकारण्यात येत असून थकित बाकीदारांवर २४ टक्के व्याजदर अधिकचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन २४ टक्के व्याजदर ताबडतोब कपात करण्यात यावी, शहरातील पथदिवे दिवसभर चालू असतात वेळेनुसार बंद चालू करण्यात यावे,कालेजी देवी ते बारड बायपास पर्यंत पथदिवे लावण्यात यावे, उमरी रोड ते नांदेड रोड वरील बंद असलेले पथदिवे चालू करण्यात यावे, ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांसाठी, शाळकरी मुलींसाठी आणि महिला भगिनींसाठी शौचालयाची व्यवस्था नगरपरिषदेच्या सुलभ शौचालयाच्या माध्यमातून करून महिलांसाठी शौचालय गृह निर्माण सुविधा पुरवण्यात यावी. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि वाल्मिकी ऋषीं यांच्या पुतळ्याच्या नियोजीत जागेतील व्यापारी संकुल समोरील गाळ्यातील दोन्ही बाजूने नव्याने शौचालय चालू करण्यात येत असून ते व्यापारी संकुल च्या पाठीमागच्या भागात बांधकाम करण्यात यावे सह इतर मागण्यांसाठी निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनावर शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष कैलास गोडसे, माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, माजी उपाध्यक्ष लक्ष्मणराव देवदे, माजी उपाध्यक्ष करीम खान साहब, जिल्हा सहसचिव गिरीश कोत्तावार, तालुका कार्याध्यक्ष मोहम्मद गौस अब्दुल नबी, शहर उपाध्यक्ष सूर्यकांत चौदंते, शहर सचिव अतिक अहमद, शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष मुजीब पठाण, संजय बोकेफोड, युवक काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष अविनाश चौदंते, युवक काँग्रेसचे शहर सचिव आकाश सोनटक्के, राधेश्याम पाटील ढगे, कुलदीप मल्लेवार, मोहम्मद युसुफ अब्दुल रहमान, अब्दुल लतिफ टेलर, संजय बोकेफोड, शेख मोइन भाई फुलवाले, सुरेश पाटील ढगे, यशवंत रणखांबे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**मार्क मेमो हरवला आहे**

नंदगाव तांडा पाटी ते इस्लापूर प्रवासादरम्यान **जोशी मंगल नारायणराव** या नावाचा पूर्वतयारी परीक्षा ( यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ) चा मार्क मेमो व इतर कागदपत्र हरवले आहेत. तरी कोणाला मिळाल्यास संपर्क करावा.

**पत्ता :**
**जोशी मंगल नारायणराव**
**रा. इस्लापूर ता.किनवट**
**मो.९६५७७२५३८३**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## एमआयडीसी, महामार्ग प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात

# आ.संदीप क्षीरसागरांकडून बीडच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर संभाजीनगरमध्ये बैठका

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती दि.१५ फेब्रुवारी**

बीडच्या अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.१४) एमआयडीसी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात बैठका घेतल्या. यावेळी बीड येथील एमआयडीसीचा विकास आणि बीडच्या बायपासवरील स्लीप सर्व्हिस रोड व उड्डाणपूलांच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली.



बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास होण्यासाठी नवनवीन उद्योग बीडमध्ये यावे लागतील. त्यामुळे सर्वप्रथम बीड शहरात असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांचा, बीडच्या एमआयडीसीच्या विकासाबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. गेल्या आठवड्यातच आ.क्षीरसागर यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकार्यांसमवेत बैठक घेतली होती. यानंतर आता पुन्हा छत्रपती संभाजी नगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालयात आ.क्षीयसागर यांनी याच विषयावर बैठकप घेऊन एमआयडीच्या वरिष्ठ अधिकार्यांसमवेत सविस्तर चर्चा केली. यासोबतच बीडच्या बाह्यवळण रस्ता म्हणजेच बायपासवर उड्डाणपूल नसल्यामुळे नियमितपणे अपघात होत होते. तसेच स्लीप सर्व्हिस रोड नसल्यामुळे नागरिकांना वाहतुकीसाठी मोठी अडचण निर्माण झाली होती. याबाबतही आ.संदीप क्षीरसागरांनी शासन, प्रशासन आणि न्यायालयात पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला. आता बीडच्या बायपासवर महालक्ष्मी चौक, जिरेवाडी व छत्रपती संभाजी महाराज चौक, समनापूर या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि परळी रोड, नाथापूर रोड, इमामपूर रोड या ठिकाणांवर स्लीप सर्व्हिस रोडच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू आहे. याबाबतचा आढावाही आ.संदीप क्षीरसागर बैठकीत घेतला. संभाजीनगर येथे झालेल्या एमआयडीसीच्या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सोनाली मुळे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, प्रकल्प संचालक श्री.रवींद्र इंगोले यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने भिमाई जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१५ फेब्रुवारी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीने शुक्रवार रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या माता भिमाई यांची जयंती सांची बुद्ध विहार केसापुरी कॅम्प या ठिकाणी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची शुरूवात तथागत गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता भिमाई यांच्या प्रतिमांचे पुजन करुण धम्म वंदनेने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य डी पी वाघमारे होते. तर भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका लिलाताई उजगरे,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, बी राजभोज, माजी संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान,तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे उपस्थित होते.



शामभाऊ वाघमारे,लिलाताई उजगरे,एन बी राजभोज यांनी भिमाईच्या जिवनावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक बौद्धाचार्य डी पी पोटभरे केले तर सुत्रसंचलन साळवे यांनी केले.

कार्यक्रमासाठी नितीन डोंगरे, भगवान डोंगरे, राजेभाऊ साळवे,,मोहन काकडे ,गणपत भालेराव , सिद्धांत साळवे, शरद उजगरे, पोहरेताई, वैशालीताई गायकवाड, रमाताई राजभोज,प्रभावती वाघमारे ,गायसमुद्रेताई,कौसाबाई आवचारे,यांच्या सह भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# माजलगावातील भागवत कथेची उत्साहात सांगता

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१५ फेब्रुवारी**

माजलगाव शहरामध्ये शिवसेवाभावी संस्थेच्या वतीने शिवजयंतीनिमीत्त आयोजित विवाह सोहळ्यातील श्रीमद् भागवत कथेची सांगता आज दि. १४ शुक्रवारी झाली.

शहरामध्ये बाळु ताकट यांचे वतीने शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने आगळ्या - वेगळ्या पध्दतीने शिवजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन सामुदायिक विवाह सोहळ्याच्या ठिकाणी श्रीमद् भागवत कथा झाली. दि. ८ फेब्रुवारीला कथेला सुरूवात झाली होती. उज्जैन मध्यप्रदेश येथील कथाकार साध्वी अनन्या दिदी शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतुन मागील सात दिवस कथा चालली. सात दिवसीय श्रीमद् भागवत कथेतुन अनन्या दिदींनी



विवीध पैलु सांगीतले तर कथेत शिव - पार्वती विवाह, कृष्ण जन्मोत्सव, गोवर्धन पर्वत, श्रीकृष्ण लिला, कंस वध, रूक्मीणी विवाह, व्दारकादीश - सुदामा भेट अशा विवीध झ्याक्यांनी कथेने लक्ष वेधले होते. दि. १४ शुक्रवारी या भागवत कथेची सांगता झाली तर याच ठिकाणी दि. १४ ते १६ किर्तन महोत्सव, दि. १७, १८, १९ फेब्रुवारी दरम्यान तिरूपती बालाजी देवस्थान येथील श्रीनिवास कल्याणम् महोत्सवात श्री देवी व भुदेवी भगवान स्वामी व्यंकटेश्वर सोबत दिव्य लग्नाची अनुभुती घेण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक बाळु ताकट, विनोद लड्डा, राहुल मुगदिया, प्रविण चांडक, एकनाथ मस्के, जगदीश साखरे, महेश होके यांचेसह आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

## ढोरगावच्या सरवदे कुटुंबाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१५ फेब्रुवारी**

वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून ढोरगाव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव विठ्ठलराव सरवदे यांच्या कुटुंबीयांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

शहरा पासून जवळच असलेल्या ढोरगाव येथील पोलीस पाटील कै. विठ्ठलराव सरवदे यांच्या पंधराव्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे मुलं माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव सरवदे आडत व्यापारी साहेबराव सरवदे प्रतिष्ठित शेतकरी छगनराव सरवदे डॉक्टर सदाशिव सरवदे या चार मुलांनी व त्यांच्या कुटुंबियांनी इतर खर्चाला फाटा देऊन जिल्हा परिषद शाळा लाहामेवाडी येथील विद्यार्थ्यांना दि.१३ फेब्रुवारी सकाळी दहा



वाजता शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमास च्या अध्यक्षस्थानी सरपंच अशोकराव वाघमारे होते तर उद्घाटक म्हणून सेवानिवृत्त बि.डि.ओ. सुभाषराव गडदे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक ओंकार खुरपे शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले माजी उपनगराध्यक्ष सतीश शेठ दुगड उद्योजक संपतराव हराळ मल्हार पतसंस्थेचे चेअरमन विशाल देवकते सेवानिवृत्त मुख्याध्यापक भगवानराव धरपडे, सेवानिवृत्त कर्मचारी अशोकराव देवकते, मल्हार सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष अशोकराव डोने, मुंजा हरी चिंचोलकर तुकाराम यमगर चंद्रकांत कापसे माणिकराव मदने गोपीनाथ मदने प्रकाश हांडे, शाळेचे मुख्याध्यापक शेख वहाब सहशिक्षक थेटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सहकार भारतीचे मार्गदर्शक सतीश मराठे यांच्या अमृत महोत्सव समारोहाचे १९ फेब्रुवारी रोजी आयोजन

**सहकारातील कार्यकर्त्यांनी उपस्थित रहाण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ फेब्रुवारी**

सहकार भारतीचे मार्गदर्शक सतीशजी मराठे यांच्या अमृत महोत्सव समारोहाचे बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या अभिष्टचिंतन सोहळयास सहकार क्षेत्रात कार्यरत कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ऍड.राजेश्वरराव देशमुख आणि बँकेच्या संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर व स्थानिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

'बिना संस्कार नहीं सहकार' हे ब्रीदवाक्य असलेली 'सहकार भारती' ही सहकारी क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर काम करणारी एकमेव स्वयंसेवी संस्था आहे. १९७९ मध्ये स्थापन झाल्यापासून आजपर्यंत, सहकार भारतीचे कार्य २८ राज्ये आणि ६५० हून अधिक जिल्हा केंद्रांमध्ये विस्तारले आहे. आज सहकार भारतीचे अनेक कार्यकर्ते हे सहकारी क्षेत्रातील सर्वोच्च संस्थांमध्येही सातत्यपूर्ण कार्य करीत आहेत. सहकार भारतीच्या संस्थापक सदस्यांपैकी एक प्रमुख कार्यकर्ते श्री.सतीश मराठे यांनी नुकतेच १ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केली. श्री.मराठे यांनी अनेक वर्षे सहकार भारती महाराष्ट्राचे सरचिटणीस म्हणून ही उल्लेखनीय काम केले आहे आणि आज ही ते एक सामान्य कार्यकर्ता म्हणून काम करीत आहेत. काळानुसार, त्यांनी सहकार भारतीच्या राष्ट्रीय सरचिटणीस, राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय संरक्षक इत्यादी महत्त्वाच्या पदांवर जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. या मालिकेत, श्री.मराठे यांना दुसऱ्यांदा आरबीआयचे संचालक होण्याची सुवर्णसंधी ही मिळाली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत काम करीत असताना, श्री.सतीश मराठे यांनी बँक ऑफ इंडियामधून त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरूवात केली. सहकार भारतीचे काम करण्यासाठी, श्री.मराठे यांनी सहकारीता क्षेत्रातील डोंबिवली नागरी सहकारी बँक आणि जनकल्याण सहकारी बँकेत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदारी अतिशय कार्यक्षमतेने पार पाडली. श्री.सतीशजी यांनी इंडियन बँक्स असोसिएशन आणि महाराष्ट्र आणि गोवा स्टेट अ‍ॅपेक्स बँकेचे संचालक म्हणूनही काम केले आहे. श्री.सतीशजी यांच्या अद्वितीय कार्याचा सन्मान करण्यासाठी, सहकार भारतीने बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबईत श्री.सतीश मराठे अमृत महोत्सव सोहळा आयोजित केला आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरचिटणीस श्री.भैय्याजी जोशी हे उपस्थित असतील आणि विशेष अतिथी म्हणून इफकोचे व्यवस्थापकीय संचालक श्री.डॉ.उदय शंकर अवस्थी आणि केंद्रीय सहकार राज्यमंत्री श्री.मुरलीधर मोहोळ हे मान्यवर उपस्थित राहतील. या कार्यक्रमात माजी केंद्रीय मंत्री श्रीमान सुरेश प्रभू स्वागत समारंभाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहतील. या समारोहात संपूर्ण भारतातील नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, साखर कारखाने, दूध संघ, मत्स्यव्यवसाय इत्यादी क्षेत्रातील १२०० हून अधिक सक्रिय कार्यकर्ते उपस्थित राहतील असा अंदाज आहे. हा कार्यक्रम बीएपीएस श्री स्वामी नारायण मंदिर, स्वामी नारायण चौक, दादर सेंट्रल रेल्वे स्टेशनसमोर, दादर (पूर्व) मुंबई - ४०००१४ या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी आम्ही तुम्हाला मनापासून आमंत्रित करीत आहोत. असे डॉ.उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष), दीपक चौरसिया (राष्ट्रीय सरचिटणीस) यांनी कळविले आहे. तरी या गौरवपर कार्यक्रमास बहुसंख्य कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थिती द्यावी असे दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ऍड.राजेश्वरराव देशमुख, तथा बँकेच्या संचालिका शरयूताई हेबाळकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी केले आहे.



# आकांक्षा कऱ्हाड यांची जलसंधारण अधिकारी म्हणून निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ फेब्रुवारी**

येथील आकांक्षा अंगदराव कऱ्हाड यांची महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागात जलसंधारण अधिकारी (गट - ब) म्हणून निवड झाली आहे.




आकांक्षा ही अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक अंगदराव कऱ्हाड यांची कन्या असून तिने आपले शालेय शिक्षण श्रीमती गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या शाळा व महाविद्यालयीन शिक्षण योगेश्वरी महाविद्यालय,अंबाजोगाई येथे पूर्ण केले. तसेच तिने चइएड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंबाजोगाई येथून बी.ई (सिव्हिल) तर ऋश्रींशलहपळलरश्र एपसळ-पशशीळपस इघखढ भालकी येथून च.ढशलह. पूर्ण केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०२३ साली आयोजित करण्यात आलेल्या एकत्रित स्पर्धा परीक्षेच्या निकालावर आधारित जलसंधारण अधिकारी म्हणून त्यांना महाराष्ट्र शासनाने नियुक्ती पत्र दिले आहे.

तिने मिळवलेल्या या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाले, संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकरराव चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य तसेच संचालक मंडळातील सर्व सदस्य व इतर प्रतिष्ठित मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# रोटरीच्या शैक्षणिक साहित्य उपक्रमाअंतर्गत शाहू विद्यामंदिरला टीव्ही संच भेट



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१५ फेब्रुवारी**

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या पुढाकाराने, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी जयेश पटेल यांच्या मेसर्स पी पी पटेल अँड कंपनी आणि रोटरी फौंडेशन च्या अर्थसह्याने व रोटरी क्लब ऑफ केजच्या उपक्रमांअंतर्गत केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर शाळेला टीव्ही संच भेट देण्यात आला.

शैक्षणिक साहित्यांतर्गत विद्यार्थ्यांना आकलन क्षमता वाढावी व शिक्षण अधिक सुलभ होऊन अभ्यासाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने या टीव्ही संचाची अभ्यासक्रमाची डिझायनिंग करण्यात आली आहे. डिजिटल क्लासरूम च्या माध्यमातून गरजू शाळांना आपल्या अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी रोटरी ने हा उपक्रम हाती घेतला आहे. येत्या पाच वर्षात प्रतिवर्षी जिल्ह्यातील शंभर शाळांना अशा डिजिटल रुम तयार करण्यासाठी रोटरी मदत करणार आहे.


केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर या शाळेत पहिल्या उपक्रमात अंतर्गत हा टीव्हीसंच भेट देऊन त्यामध्ये इयत्ता पहिली ते दहावीचा अभ्यासक्रम इन्स्टॉल करण्यात आला आहे. यावेळी सोलापूर रोटरीचे रो अतुल चव्हाण, रो महेश साळुंके, रो उदय शिंदे , केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, केज रोटरीचे हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, सत्यवान राऊत, संस्थेचे अध्यक्ष ऍड राजेसाहेब देशमुख, सचिव जी बी गदळे, मुख्याध्यापिका सौ चाटे-गदळे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी या महत्त्वाच्या उपक्रमाला आर्थिक सहाय्य करणाऱ्या मे. पी पी फौंडेशन चे केज रोटरीने विशेष आभार मानले.

# स्वा सावरकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे जेईई मेन २०२५ परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ फेब्रुवारी**

स्वा.सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड मधील १२ वी विज्ञान शाखेतील श्रावणी अशिष मालू ९९ % अदित्यअमोल कुलकर्णी ९७ % अभिजित भागवत सवासे ९५ % या विद्यार्थ्यांनी जेईई मेन परिक्षेत यश मिळवले आहे. सर्वांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य ,प्रा चंद्रकांत मुळे प्रशासकीय अधिकारी, विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप , स्थानिक व्यवस्था मडंळ अध्यक्ष डॉ पुरुषोत्तम कुलकर्णी , स्थानिक व्यवस्था मंडळ कार्यवाह डॉ अविनाश देशपांडे , शालेय समिती अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी , प्राचार्य विठ्ठल काळे , उपमुख्याध्यापक माधव जोशी, विभागप्रमुख प्रा बाळासाहेब साळवे , सर्व प्राध्यापक वृंद यांनी केले आहे .




# महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शाळा कृती समितीचा १२ वी पेपर तपासणीवर बहिष्कार

### १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी जोपर्यंत शासन करणार नाही तोपर्यंत संपूर्ण राज्यभरात १२ वी च्या पेपर तपासणीवर बहिष्कार-रत्नाकर माळी

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ फेब्रुवारी**

शिक्षकांच्या आंदोलनामुळे महाराष्ट्र शासनाने प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना वाढीव टप्पा १० ऑक्टोबर च्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला व त्याचा शासन निर्णय १४ ऑक्टोबर २०२४ रोजी काढण्यात आला,परंतु ४ महिने झाले तरी अध्याप ही शासन हालचाल करताना करीत नाही खरे तर हिवाळी अधिवेशनात याचा निधी मंजूर होणे आवश्यक होते, परंतु राज्य सरकारने वेळकाढूपणा केला, पण येणाऱ्या मार्च च्या अधिवेशनात १४ ऑक्टोबर च्या निर्णयाची अंमलबजावणी होऊन निधी मंजूर होणे आवश्यक आहे यासाठी राज्यभरात सर्वच विधानसभा व विधानपरिषद यांच्या मधील आमदारांनी तशी पत्रे सरकारला दिली आहेत.

गेल्या २५ वर्षांपासून शिक्षक उपाशीपोटी राबतोय पण शासनाला दिसत नाही . आम्ही फक्त समाज घडवायचा का ? आम्ही खायचे काय ?आमची कुटूंबे जगवणार कशी ? एवढे होऊन ही हक्काच्या वेतनासाठी आम्हीच रस्त्यावर उतरून झगडावे लागत आहे हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारे नाही,

त्यामुळे जोपर्यंत १४ ऑक्टोबर ची अंमलबजावणी शासन करीत नाही तोपर्यंत इ १२ वीच्या पेपर तपासणी वर आमचा बहिष्कार कायम राहील

याबाबत आम्ही प्रशासनाला २० जानेवारी २०२४ लेखी कळविले होते जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत व १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी केली नाही तर इ १२ वी च्या पेपर तपासणीवर बहिष्कार टाकला जाईल संबंधित प्रशासनाने ही याकडे दुर्लक्ष केले

हा बहिष्कार संपूर्ण राज्यात जाईल कोणतेही पेपर सोडवून घेतले जाणार नाहीत व तपासले ही जाणार नाहीत शासनास१आमची नम्रपणे विनंती आहे की १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी अन्यथा आम्ही आमच्या आंदोलनावर ठाम आहोत, याबाबत कोल्हापूर, सांगली सातारा रत्नागिरी सिधुदुर्ग हे सर्व जिल्हे सहभागी झाले आहेत उर्वरित सर्व महाराष्ट्रात बहिष्कार टाकला जाईल असे कृती समितीचे उच्च माध्यमिक चे विभागीय अध्यक्ष श्री रत्नाकर माळी यांनी सांगितले यावेळी राज्य निमंत्रक संजय लश्करे सचिव डॉ.चंद्रकांत बागणे, जिल्हाध्यक्ष भारत शिरगावकर,

जयसिंग जाधव यासह अनेक शिक्षक उपस्थित होते,

खंडेराव जगदाळे

राज्य सरकारने आमची फसवणूक न करता १४ ऑक्टोबर २०२४ चा शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी व येणाऱ्या अधिवेशनात त्याची तरतूद करण्याबाबत निर्णय लवकरात लवकर न घेतल्यास इ १० वी च्या परीक्षेच्या पेपर तपासणीवर आम्ही ही बहिष्कार टाकणार

खंडेराव जगदाळे

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान सहन करणार नाही

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात परीक्षा व्यवस्थेतील गोंधळामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे असा आरोप करत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर शाखेच्या वतीने महाविद्यालय प्रशासनाला निवेदन देण्यात आले.



१२ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे संलग्नित महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या संगणक शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांचा सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग विषयाचा पेपर झाला. मात्र, नवीन अभ्यासक्रमाऐवजी जुन्या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका देण्यात आली. हा प्रकार परीक्षा संपल्यानंतर उघडकीस आला, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली.

या संदर्भात अभाविपचे प्रदेश सहमंत्री सुशांत एकोर्गे यांनी सांगितले की, महाविद्यालय आणि विद्यापीठ प्रशासनाच्या तांत्रिक चुकांमुळे ७९ विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून, विद्यापीठ प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढावा. अन्यथा, विद्यार्थ्यांचा रोष महाविद्यालय प्रशासनाला सहन करावा लागेल.



### संक्षिप्त वृत्त...

## रहदारीस अडथळा; चालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** विवेकानंद चौक परिसरात रहदारीच्या ठिकाणी ऑटो उभा करून स्वतः च्या व इतरांच्या जीविताला धोका निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण केल्याची घटना घडली. याबाबत ऑटोचालकाविरुद्ध विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार मुजवरखा पठाण यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार पठाण करीत आहेत. रस्त्यात ऑटो उभा केल्याने रहदारीला अडथळा निर्माण झाला होता.

## मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेला मुदतवाढ द्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** सत्तेत येण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य विकास प्रशिक्षण योजना जाहीर करणे आणि पुन्हा सत्तेत आल्यानंतर ही योजना संपुष्टात आणण्याचा निर्णय घेणे म्हणजे राज्यातील लाखो बेरोजगार युवकांची चेष्टा करण्यासारखे आहे. त्यांच्या भविष्याशी, त्यांच्या स्वप्नांशी खेळण्याचाच हा प्रकार होईल. त्यामुळे तात्काळ मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.
मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य विकास प्रशिक्षण योजना संपुष्टात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचे पत्र संबंधित विभागाकडून जाहीर झाले आहे. एकाच वेळी राज्यातील लाखो तरुण पुन्हा बेरोजगार होणार असल्याने तरुणांमध्ये नाराजी पसरली आहे. याची दखल घेऊन लातूर ग्रामीणचे माजी आमदार देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे योजनेला मुदतवाढ मिळण्याची मागणी केली आहे.

## राजर्षी शाहू महाविद्यालयाची जेईई मेन्स परीक्षेत यशाची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेण्यात आलेल्या जेईई मेन्स परीक्षेच्या पहिल्या सत्राचा निकाल जाहीर झाला असून, राजर्षी शाहू कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.
महाविद्यालयातील ४२५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. पैकी ३५४ विद्यार्थ्यांचा निकाल आतापर्यंत प्राप्त झाला आहे. त्यामध्ये ९९ पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण घेणारे १६ विद्यार्थी, ९८ पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण घेणारे ४८ विद्यार्थी, ९७ पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण घेणारे ६३ विद्यार्थी, ९५ पर्सटाइल पेक्षा अधिक गुण घेणारे १०७ विद्यार्थी, ९० पेक्षा अधिक गुण घेणारे १८६, ८० पर्सेंटाइल पेक्षा अधिक गुण घेणारे २२९ विद्यार्थी आहेत. शिवोहम् प्रतापसिंह शिंदे हा विद्यार्थी ९९.९० पर्सेंटाइल गुण घेऊन महाविद्यालयातून प्रथम आला आहे. सुशांत सुधाकर होळकर ९९.९०३ द्वितीय, रोनक निरंजन अग्रवाल ९९.८८ पर्सेंटाइल गुण घेऊन तृतीय आला आहे. सायली किरण पाटील ९९.१७ पर्सेंटाइल घेऊन मुलींत प्रथम आली. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

## कॉपी केल्यास गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत बारावीची लेखी परीक्षा जिल्ह्यातील १०० केंद्रांवर घेण्यात येत आहे. तसेच २१ फेब्रुवारीपासून १५२ केंद्रांवर दहावीची परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षा कालावधीत कॉपीकेसमध्ये विद्यार्थी आढळल्यास कॉपी करणारा, कॉपीला सहकार्य करणाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार असल्याचा इशारा शिक्षण मंडळाने दिला आहे.

यंदा दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत होणार आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यात दहावीसाठी ६८२ शाळांमधील ३९ हजार ९४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. १५२ केंद्रांवर परीक्षा होणार असून, दहावीसाठी २० आणि बारावीसाठी १७ परीरक्षक विभागीय मंडळाने नियुक्त केले आहेत अशी माहिती शिक्षण मंडळाने दिली आहे.

## अर्थसंकल्पामुळे नागरिक होतील देशविकासाचे भागीदार :भाजपचे प्रदेश प्रवक्ते शितोळे

### प्रत्येक घटकाच्या बळकटीकरणासाठी ठोस तरतुदी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला देशाचा सर्वसमावेशक अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने जाणारा मार्ग अधिक प्रशस्त करणारा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीयांची बचत वाढणारा असून त्यांची क्रयशक्ती उंचावल्याने देशाच्या विकासाला चालना मिळेल हे १४० कोटी भारतीयांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. त्यामुळे विकसित भारताचे ध्येय सामान्य नागरिकच पुढे नेतील, असा विश्वास भाजपचे प्रदेश प्रवक्ते किशोर शितोळे यांनी आज पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

नागरिकांची बचत वाढून तेच देशविकासाचे भागीदार कसे बनतील, यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी भाजपचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, जिल्हा सरचिटणीस रवी सुडे, ॲड. प्रदीप मोरे, ॲड. दिग्विजय काथवटे, मीनाताई भोसले, रागिणी यादव, आबा चौगुले, प्रमोद गुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

किशोर शितोळे म्हणाले, शेतकरी, गरीब, महिला आणि युवा हे विकसित भारताचे चार प्रमुख स्तंभ असून या चारही घटकांच्या सशक्तीकरणासाठी अर्थसंकल्पाने महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. प्रत्येक क्षेत्राला गती देणाऱ्या तरतुदी अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत. गरीब आणि माध्यमावर्गीयांना सशक्त करणारा तरुणांना रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण करणारा आहे. असा विश्वासही शितोळे यांनी यावेळी व्यक्त केला.



ग्रामीण विकासासाठी कृषी क्षेत्र, उद्योजकता वाढ, रोजगारनिर्मिती, एमएसएमई क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि नाविन्यासाठी गुंतवणूक तसेच जागतिक स्तरावर आर्थिक स्पर्धात्मकतेसाठी निर्यात क्षेत्र या चार प्रमुख आधारस्तंभांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

करप्रणाली, शहरी विकास, खाणकाम, वित्तीय सुधारणा, ऊर्जा आणि नियामक सुधारणा या सहा क्षेत्रांतील सुधारणांना प्राधान्य देण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. शितोळे यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. प्रारंभी जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रदीप मोरे यांनी किशोर शितोळे यांचा परिचय करून दिला. केले. तर जिल्हा सरचिटणीस रवी सुडे यांनी उपस्थित असलेल्या सर्व पत्रकारांचे आभार मानले.

## घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध वापर थांबवावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** घरगुती गॅस सिलिंडरचा वापर व्यावसायिक प्रतिष्ठाने, वाहनांसाठी करण्यात येत आहे. तो थांबविण्यात यावा, अशी मागणी ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनचे प्रशासकीय अधिकारी प्रशांत जामगडे यांनी गुरुवारी पत्रपरिषदेत केली.

यावेळी जामगडे म्हणाले, घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध वापर होत आहे. त्यामुळे दुर्घटना घडत आहेत. घरगुती गॅसचा योग्य वापर व्हावा म्हणून संस्थेच्या माध्यमातून प्रशासनाला वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, घरगुती गॅस सिलिंडरवर ५ टक्के जीएसटी आकारण्यात येते. तसेच व्यावसायिक सिलिंडरवर व ऑटो एलपीजीवर १८ टक्के जीएसटी आकारली जाते. घरगुती गॅस सिलिंडर व्यावसायिक प्रतिष्ठाने, वाहनांसाठी वापरण्यात येत असल्यामुळे महसूल विभागाचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी केली.

## कर वसूलीसाठी मनपाची धडक जप्ती मोहिम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने विविध सुट योजना देऊनही काही थकबाकीदार टॅक्स भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांच्यावर मनपा मार्फत धडक जप्ती मोहीम राबविण्यात येत आहे . त्यानुसार दि.१३/०२/२०२५ रोजी क्षेत्रीय कार्यलय ए,बी,सी,डी,च्या कार्यक्षेत्रामध्ये मालमत्ताकर व पाणी पट्टी कराच्या वसूलीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या वसूली पथकामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

क्षेत्र क्रं.एः- थकीत मालमत्ताकर रू,३७२४३७/- ०३ नळ जोडणी बंद करण्यात आले. तसेच रू,८१८३७/- थकीत कर वसूलीसाठी एक दुकान सिल करण्यात आले. क्षेत्र क्रं.बीः- थकीत मालमत्ताकर रू,२४४७१९/- दोन गोडाऊन सीलची कार्यवाही करण्यात आले. क्षेत्र क्रं.सीः- थकीत मालमत्ताकर व पाणी पट्टी कर रू,७३१२९९/- वसूलीसाठी एकूण १३ नळ जोडणी बंद करण्यात आले.

क्षेत्रक्रं.डीः-थकीतमालमत्ताकर व पाणी पट्टी कर रू,२७४२७२/- वसूलीसाठी एकूण ०३ नळ जोडणी बंद करण्यात आले. तरी या पुढेही थकीत कराच्या वसूलीसाठी नियुक्त



पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तिव्र करण्यात येणार असून सदर कार्यवाही अंतर्गत मालमत्ता सिल करणे,आटकाव करणे,नळ कनेक्शन बंद करणे,इत्यादी कार्यवाही करण्यात येणार असून मालमत्ता जप्त किंवा सिल करून मुदतीमध्ये मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव /विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे.

तरी व्याज/शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा करावा. व जप्तीसारखी कठू कार्यवाही टाळावी असे आवाहन महानगर पालिकेचे उपायुक्त (महसुल) डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## दीड वर्षापासून फरार आरोपी गजाआड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** एका डॉक्टरची फसवणूक केल्याप्रकरणातील आरोपीला लातुरातील गांधी चौक पोलीस ठाण्याच्या पथकाने मोठ्या शिताफीने अटक केली आहे.

२६ जून २०२३ रोजी शहरातील एका खासगी रुग्णालयातील डॉक्टरने १० लाख ४४ हजारांची उपकरणे दुरुस्तीसाठी संतोष मुरादे (रा. ओमकार हाईटस, बीड) याला दिली होती. मात्र, त्याने ती उपकरणे परत न करता त्याची परस्पर विल्हेवाट लावली. याबाबत विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात १७ जानेवारी २०२४ रोजी डॉक्टरांनी तक्रार दिली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच आरोपी राहत्या ठिकाणाहून निघून गेला. तेव्हापासून तो सतत राहण्याची ठिकाणे बदलत



पोलिसांना गुंगारा देत होता. याबाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने चकवा देणाऱ्या आरोपीचा शोध घेतला.

गांधी चौक ठाण्याचे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या नेतृत्वातील पोलीस पथकाला गुन्ह्यातील फरार आरोपी हा अहिल्यादेवीनगर जिल्ह्यात वास्तव्याला असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून गांधी चौक ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक आक्रम मोमीन यांच्यासह राजेंद्र टेकाळे, प्रकाश भोसले, शिवा पाटील, संतोष गिरी, शैलेश सुडे यांनी आरोपीचा शोध घेऊन त्याला अहिल्यादेवीनगर येथील पवननगर येथून ताब्यात घेतले. अधिक तपासासाठी विवेकानंद चौक ठाण्याच्या ताब्यात दिले आहे.

विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या गुन्ह्यातील फरार आरोपीच्या मागावर विशेष पथके होती. सातत्याने वास्तव्य बदलत असल्याने पोलिसांच्या तो हाती लागत नव्हता. गुन्हा दाखल झाल्यापासून बीडमधील राहत्या घरी आढळून आला नाही. त्याला ताब्यात घेण्यासाठी पोलीस अधीक्षक मुंडे यांनी आदेश दिले होते. आदेशानुसार आरोपीचा पोलिसांकडून शोध घेतला जात होता. दरम्यान, गांधी चौक पोलीस ठाण्याच्या पथकाला तो अहिल्यानगर येथे असल्याची माहिती मिळाली. तेथून त्याला अटक केली आहे.

## अनधिकृत अटक; छळ प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दोषी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** नागरिकांच्या सुरक्षेसाठी असलेल्या पोलिसांनीच अत्याचार केल्यास कायद्याचा कठोर बडगा उगारला जाईल, हे सिद्ध करणारा निकाल मुख्य न्यायिक दंडाधिकारी (सीजेएम) लातूर न्यायालयाने दिला आहे.

पोलिस कॉन्स्टेबल नामदेव गंगाराम सूरवसे याने एका नागरिकाला विनाकारण अटक करुन अमानुष मारहाण केल्याप्रकरणी त्याला एका वर्षाची शिक्षा आणि दंड ठोठावण्यात आला आहे. हा निकाल मुख्य न्यायिक दंडाधिकारी सौ. एम. एन. चव्हाण यांनी दिला आहे.

या प्रकरणात फिर्यादी पक्षाचे वकील व्ही. के. चिखलीकर यांनी युक्तीवाद करत आरोपी पोलिसाच्या कृत्याला कठोर शिक्षा व्हावी, अशी न्यायालयासमोर मागणी केली होती. यावेळी न्यायालयात सादर केलेल्या पुरव्यांच्या आधारे फिर्यादीचे वकील चिखलीकर यांनी स्पष्ट केले की, तक्रारदार विजयकुमार देशपांडे यांना कोणतेही अधिकृत कारण नसताना अटक करण्यात आली. त्यांना कायदेशीर अधिकार न देता पोलिस कोठडीत ठेवण्यात आले. जे कलम ३४२ (अनधिकृत नजरकैद) अंतर्गत गुन्हा आहे.

साक्षीदारांच्या जबाबांनूसार, आरोपी पालिसाने तक्रारदाराला अमानुष मारहाण केली. फिर्यादीच्या वकिलांनी आपल्या युक्तीवादात असेही सांगीतले की, पोलिसांनी कायद्याच्या चौकटीत राहून काम करणे अपेक्षित असते. मात्र, आरोपी कॉन्स्टेबलने आपल्या पदाचा गैरवापर करुन नागरिकावर अन्याय केला. त्यामुळे त्याला कठोर शिक्षा देऊन कायदा आणि न्याय व्यवस्थेचा धाक निर्माण करणे आवश्यक आहे.

## सुसंस्कृत लातूरच्या परंपरेला साजेशी शिवजयंती साजरी करावी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** शिवजयंतीच्या अनुषंगाने शिवभक्तांकडून जय्यत तयारी सुरू आहे. दुचाकी रॅली, मिरवणूक तसेच सामाजिक उपक्रमांनी जयंती साजरी होणार असली तरी सध्या इयत्ता १२ वीच्या परीक्षा सुरू आहेत. आयोजित कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होणार नाही, याची जाणीव ठेऊन जयंती उत्साहात साजरी करा, पण शांततामय, सुसंस्कृत लातूरला साजेशी परंपरा कायम ठेवावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक कार्यालयात शांतता कमिटीची बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पोलीस उपाधीक्षक (गृह) गजानन भातलवंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर तसेच शहरातील पाचही पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, दिलीप सागर, साहेब नरवाडे, अरविंद पवार तसेच जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक, शांतता कमिटीचे सदस्य, शिवजयंती मंडळाचे अध्यक्ष, सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होते.

यावेळी पोलीस अधीक्षक मुंडे म्हणाले, सध्या इयत्ता १२ वीची परीक्षा सुरू असून कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होणार नाही याची जाणीव ठेवा. उत्सवदरम्यान अचानक एखादा प्रश्न उपस्थित झाल्यास त्याची माहिती प्रशासनास द्यावी. दुचाकी रॅलीमध्ये वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. पारंपरिक वाद्याचा वापर करून दिलेल्या मार्गानेच मिरवणुका वेळेत पूर्ण करा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जयंती उत्सव अनुषंगाने आयोजित कार्यक्रम व येणाऱ्या समस्यांबाबत चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शिवजयंती मंडळाच्या अध्यक्षांनीही मिरवणूक मार्ग व वाहतुकीतील बदलाबाबत सूचना केल्या.

## वृक्षतोडीच्या निषेधार्थ अर्धनग्न आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ फेब्रुवारी -** वृक्षतोडीस बंदी आहे. तरीही महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात वृक्षांची तोड सुरू आहे. या संदर्भात महापालिका प्रशासनाकडून दखल घेतली जात नाही. गुरुवारी पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या समोरचे पिंपळाचे मोठे झाड तोडण्यात आले. याच्या निषेधार्थ 'ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन'च्या सदस्यांनी कपडे काढून अर्धनग्न आंदोलन केले.

लातूर जिल्ह्यात सर्वात कमी वनक्षेत्र आहे. तरीही मागील अनेक दिवसांपासून जिल्ह्यात अनियंत्रित अशी वृक्षतोड सुरू आहे. झाड छाटणीच्या नावाखाली सबंध झाडे मुळापासून तोडली जात आहेत. महावितरणाकडूनही झाडांच्या छाटण्या सुरू आहेत. महापालिकेने मागील पाच वर्षांत सबंध महाराष्ट्रात सर्वात कमी वृक्ष लागवड केली



आहे. वृक्ष संगोपनाची कोणतीही जबाबदारी महापालिका पार पाडत नाही. सामाजिक संस्थांनी झाडांना लावलेले ट्री गार्ड चोरून नेली जात आहेत. झाडे तोडली जात आहेत.

वृक्ष लागवडीमध्ये पुढाकार घेणाऱ्या सामाजिक संस्थांनाही महापालिकेचे कुठलेही सहकार्य मिळत नाही. उलट वृक्षतोडीला परवानगी दिल्या जात आहेत. काही सामाजिक संस्थांनी याचा निषेध केला. तरीही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. झाड तोडणाऱ्यांवर कुठलीही कारवाई केली जात नाही. त्यामुळे वृक्षप्रेमींकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

गुरुवारी सकाळी औसा रोडवरील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनच्या समोरील हे पिंपळाचे वृक्ष तोडण्यात आले. या संदर्भात महापालिकेने गुन्हा दाखल करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी वृक्षप्रेमींकडून करण्यात येत आहे. ट्री गार्डसह वृक्ष तोडण्याचे काम सुरूच राहिले तर लातूरची वृक्ष चळवळ कशी वाढणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, वृक्षप्रेमींनी क्रीडा संकुल परिसरात कपडे काढून अर्धनग्न आंदोलन करून वृक्षतोडीचा निषेध नोंदवला.

यावेळी डॉ. भास्कर बोरगावकर, पद्माकर बागल, डॉ. पवन लड्डा, डॉ. नागरगोजे, बालाजी उमरदंड, नागसेन कांबळे, सीताराम कनजे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत जनप्रहार कामगार संघटनेचा वर्धापन दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**

शहरातील स्व. शिवाजीराव देशमुख सभागृहामध्ये काम गारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या जनप्रहार कामगार संघटनेचा तिसरा वर्धापन दिन विविध सामाजिक उपक्रम ांनी साजरा करण्यात आला. अन्यायग्रस्त, पीडित काम गार वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी कामगार नेते नितीन दलित दवंडे यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन तीन वर्षांपूर्वी जनप्रहार कामगार संघटना महाराष्ट्र राज्य या कामगार संघटनेची स्थापना करून त्या माध्यमातून लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन, मोर्चे काढून कामगारांना न्याय देण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू ठेवला आहे. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. किशोर इंगोले म्हणाले की, कामगाराच्या हिताकरिता ही संघटना काल देखील अखंड होती आज देखील अखंड आहे आणि येणाऱ्या काळात देखील अखंड रा-हील. जनप्रहार संघटनेने या तीन वर्षातच अनेक कामगारांना शासनाशी लढा देण्यास सक्षम केले आहे. ह्या संघटनेचे पदाधिकारी कामगाराच्या हिताकरिता त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी निर्भीडपणे उभे आहेत. डॉ. इंगोले यांनी फुले-शाहू-आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांचे कामगारांच्या कल्याणासाठी असलेले योगदान सांगितले. तद्वतच संघटनेचा कार्यकर्ता कसा असावा यावर विस्तृत मार्गदर्शन केले. हवे बरोबर तोंड फिरवणारे शंभर लोक असण्यापेक्षा वादळात उभी राहणारी मोजकीच लोकं पाहिजे. संघटनेचा प्रत्येक कार्यकर्ता हा निष्ठावान असला पाहिजे. संघटना म्हणजे पोट भरण्याचे साधन नसून समाज परिवर्तनाचे माध्यम आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांचा नवीन निवडीबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समिती चे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत रामटेके हे हो-ते. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष स्वामी विवेकानंद सेवा ट्रस्ट, मुख्य कार्यकारी अधिकारी पुरुषोत्तम कुटे हे होते. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समितीचे प्रदेश सह कोषाध्यक्ष रत्नपाल डोफे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथील सहयोगी प्राध्यापक तथा आंबेडकरी विचारवंत डॉ. किशोर इंगोले हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सरकारी कामगार अधिकारी टी ई कराड, रिपब्लिकन सेना युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, सरकारी कामगार अधिकारी हिंगोली चे सेवानिवृत्त कर्मचारी भीमराव दवंडे, सुप्रसिद्ध गीतकार गोविंद भारशंकर आदी उप-स्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संघटनेच्या तीन वर्षाच्या कामाचा लेखाजोगा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नितीन दवंडे यांनी मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दीपिका सरकटे, यांनी केले तर आभार प्रदर्शन दे-वराव वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पदाधिकारी, महिला वर्ग व पुरुष मंडळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थापक सचिव सिद्धार्थ दवंडे, पवन ढवळे, राजेश पारधे, रोहित नगरकर, रवी आ-हेर, विशाल गायकवाड व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# आदर्शमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**

येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (पीएम उशा) अंतर्गत क्रीडा विभागाच्या वतीने नवीन शैक्षणिक धोरण : २०२० शी संबंधित क्रीडा क्षेत्रातील क्रेडिट स्कोअरची अंमलबजावणी या विषयावर एक दिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळचे आयोजित करण्यात आले.

या कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांची उपस्थिती होती तर उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ म राठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील क्रीडा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. कैलास पाळणे हे उपस्थित होते. सदरील कार्यशाळेला साधन व्यक्ती म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील आंतरविद्या शाखेचे अधिष्ठाता मा. प्रा.(डॉ.) चंद्रकांत बाविस्कर हे होते.

तसेच प्रा. (डॉ.) दिपक बच्चेवार प्राचार्य, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती, ता. अहम दपूर, जि. लातूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील सिनेट सदस्य डॉ. महेश बेंबडे, डॉ. मीनानाथ गोमचाळे सदस्य, क्रीडा अभ्यास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, एमसीव्हीसी समन्वयक डॉ. संजय कयाल, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सचिन पत्की, पीएम उशा समन्वयक प्रा. अमजदखान पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटणीय भाषणात डॉ. कैलास पाळणे यांनी नविन शैक्षणिक धोरण:२०२० यावर सखोल मार्गदर्शन केले. या धोरणात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल तसेच शारीरिक व मानसिक दृष्ट्या सुदृढ कसा होईल याचा विचार करण्यात आला आहे, त्यादृष्टीने खेळाला महत्त्व दिले पाहिजे. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार होतील असे मत मांडले.

अध्यक्षीय भाषणात प्रो. डॉ. विलास आघाव यांनी खेळ, योग, जीवनातील ध्यान आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे सतत वाढत जाणारे महत्त्व समजून घेऊन, नवीन शैक्षणिक धोरण : २०२० द्वारे कल्पना केलेली खेळाशी संबंधित उद्दिष्टे पूर्ण करण्याचा मानस आमच्या या कार्यशाळेचा आहे. हि कार्यशाळा उच्च शिक्षणात खेळाचे महत्त्व प्रभावीपणे समजण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल असे मनोगत व्यक्त केले.

पहिल्या तांत्रिक सत्राचे अध्यक्ष डॉ. महेश बेंबडे होते या सत्राचे बीज भाषक म्हणून प्रा.(डॉ.) चंद्रकांत बाविस्कर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी नाविन्यपूर्ण क्रीडा तंत्र, ट्रेंड आणि वैयक्तिक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे मत मांडले तसेच क्रीडा आणि एकूण शैक्षणिक कार्यक्रमातील क्रेडिट स्कोअर प्रणालीबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या तांत्रिक सत्राचे अध्यक्ष डॉ. मीनानाथ गोमचाळे होते. या सत्राचे बीज भाषक म्हणून प्राचार्य डॉ. दिपक बच्चेवार यांनी मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरणाकडे आंधळेपणाने न बघता डोळसपणे बघायला पाहिजे. भारतातील क्रीडा क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी, राष्ट्राच्या समग्र विकासासाठी, क्रीडा शक्तीचा वापर करण्यासाठी, राष्ट्र उभारणीसाठी खेळाशी संबंधित अभ्यासक्रम तयार करून क्रेडिट स्कोअर निर्माण केले पाहिजे असे मत व्यक्त केले. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रास्ताविकपर मनोगत क्रीडा विभाग प्रमुख व संयोजक डॉ. आनंद भट्ट यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन हाटकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. नरेंद्र रायलवार यांनी केले.

सदरील कार्यशाळेच्या यशस्वी नियोजनासाठी क्रीडा विभागाचे विभाग प्रमुख व संयोजक डॉ. आनंद भट्ट, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सचिन पत्की, पीएम उशा समन्वयक प्रा. अमजदखान पठाण, प्रा. नरेंद्र रायलवार, कार्यालयीन अधीक्षक दिलीप दुबे, कैलास डिडाळे, प्रा. गजानन चव्हाण, डॉ. सुयोग दोडल, डॉ. विलास पवार, डॉ. अविनाश पावडे, डॉ. अण्णाजी मडावी, डॉ. बस्वराज लक्षटे, डॉ. प्रशांतकुमार जोशी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**

शहरातील खटकाळी बायपास येथे आज दिनांक १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता सद्गुरु सेव-ालाल महाराज यांच्या २८६ व्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर मोफत बॉडी चेकअप मिशन २०२५-२६ फिट इंडिया अंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर अनेक नव तरुणांनी तसेच समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरात रक्तदान केले. तसेच मिशन २०२५-२६ फिट इंडिया अंतर्गत या शिबिरात मोफत बॉडी चेकअप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन विलास चव्हाण यांच्यावतीने करण्यात आले होते. रक्तदान शिबिरात जवळपास ४५ लोकांनी रक्तदान केले. तर मोफत बॉडी चेक अप मध्ये जवळपास ८० लोकांनी मोफत बॉडी चेक अप केली. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी विलास चव्हाण, आरोग्य सल्लागार सुनील राठोड, शेषराव चव्हाण, शेषराव राठोड, गजानन राठोड, अश-ोक चव्हाण, एकनाथ राठोड, प्रवीण चव्हाण, सुनील रिठे, अमित मोडक, ज्ञानेश्वर फरकंडे, किशनराव फलटणकर, सविता राठोड,स्नेहा मोडक,राहुल नरवाडे यांच्या सह इतरांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त

### उद्योगांशी संबंधीत बैठकीला उपस्थित रहावे

हिंगोली- जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, (दि.१७) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, जिल्हा सल्लागार समिती सभा, स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य जिल्हास्तरीय समिती सभा व आजारी उद्योग पुनरुज्जीवन जिल्हास्तरीय समिती सभा, जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा, डीएलटीएफसी संबंधित बैठकीचे जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस जिल्ह्यातील औद्योगिक संघटनेचे पदाधिकारी, उद्य-ोजक संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहाणार आ-हेत. तरी जिल्ह्यातील उद्योजकांनी आपल्या उद्योगाशी संबंधित अडी-अडचणी सोडविण्यासाठी व आपल्या समस्याचे निराकरण करण्यासाठी या बैठकांमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम यांनी केले आहे.

### सक्षम संरक्षण क्षमता महोत्सवाचे आयोजन




औंढा नागनाथ- जीवाश्म इंधनावरील वाया जाणारा खर्च रा-खणे, परकी तिजोरीवरील वाढता भार कमी करणे, आणि जीवाश्म इंधन जाळल्यामुळे निर्माण होणाऱ्या हरितगृह वायूंच्या प्रतिकूल परिणामापासून पर्यावरणाचे संरक्षण करणे यासाठी जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने सक्षम संरक्षण क्षमता महोत्सवाचे आयोजन केले आहे.हा महोत्सव १४ फेब्रुवारीते २८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित होणार असून संपूर्ण देशभर या महोत्सवाचे टॅगलाईन 'ग्रीनअँडक्लीन एनर्जीद्वारे क्लीन एन्व्हायरमेंट अर्थात हरित व स्वच्छ ऊर्जेचे अंगीकार करा व पर्यावरणात स्वच्छ बनवा अशी आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय व तेलउद्योगाचे राज्यस्तरीय समन्वयक संबंधित राज्य सरकारच्या सक्रिय सहभागाने जनजागृती पसरविण्यासाठी दरवर्षीच विविध उपक्रम हाती घेतात. पेट्रोलियम उत्पादनाच्या संवर्धनासाठी धोरणे प्रस्तावित करण्यात सरकारला मदत करण्यासाठी तेल विपणन कंपन्या आघाडीवर असतात. सक्षम संरक्षण क्षमता महोत्सवांमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गट चर्चा, वादविवाद, महाविद्यालयामध्ये भीतीचित्र स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा, लेख लेखन, पत्रकार परिषद आणि टीव्ही व रेडिओवरील टॉक शो असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यावेळी जिल्हा नोडल अधिकारी दिलीप बिसीकर, महेश शेळके, महेश भांगडिया आदींची उपस्थिती होती.

# शासकीय विश्रामगृहात संत सेवालाल जयंती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**

येथील शासकीय विश्रामगृहात जिल्ह्यातील गोरबंजारा समाज बांधवांच्यावतीने संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे उपाध्यक्ष भागोराव राठोड, शंकर राठोड, उत्तमराव पवार, उल्हास राठोड, प्रा डी आर पवार, संतोष जाधव, विक्रम राठोड, वसंत जाधव, एल डी चव्हाण आदींची उपस्थिती होती. यावेळी भाग-ोराव राठोड यांनी संत सेवाल-ाल महाराज यांच्या कार्याबद्दल माहीती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एल डी चव्हाण यांनी केले तर आभार पत्रकार संतोष जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने गोर बंजारा समाज बांधव उपस्थित होते.

# पोलिस संघ आणि व्यापारी संघ विजयी

## शिवजन्मोत्सव क्रिकेट लिग सामन्यांना प्रचंड प्रतिसाद




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**

सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती व पत्रकार संघाच्या वतीने शिवजन्मोत्सवानिमित्त शहरातील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर ११ फेब्रुवारीपासून क्रिकेट लिग मॅचेसचे आयोजन करण्यात आले आहे. १५ फेब्रुवारी रोजी खेळविण्यात आलेल्या दोन सामन्यांत प्रथम सामना पोलीस संघ हिंगोली विरुद्ध महावितरण यांच्या सामना झाला यामध्ये पोलीस संघाने विजय प्राप्त केला तर दुसऱ्या सामन्यांमध्ये कोरोना योद्धा आरोग्य विभाग (जिल्हा सामान्य रूग्णालय) व व्यापारी क्रिकेट संघात अतिशय रोमहर्षक असा सामना झाला यामध्ये चित्तथरारक लढतीमध्ये व्यापारी महासंघाने विजय मिळवला.

यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष जगजितराज खुराणा, माजी उपनगराध्यक्ष बिरजू यादव, व्यापारी महासंघाचे ज्ञानेश्वर मामडे अबिद अली जहागिदार, काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते विलास गोरे, जहीर भाई विटवाले,पवन मुंदडा, सोमाणी समिती मार्गदर्शक कल्याण देशमुख, नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, शिवा घुगे आदींची उपस्थिती होती. या सामन्याचे धावते समालोचन मराठी मधुन गोपालराव सरनायक,प्रदून गिरीकर तर हिंदी मधून राकेश भट्ट यांनी केले. पंच म्हणून इम्रान कालीवाले, दिनकर कागणे तर स्कोरर म्हणून रोमन सय्यद यांनी काम पाहिले.

क्रिकेट लिग मॅचेसमध्ये १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ६:३० वाजता होणार असून पहिला सामना तृतीय बक्षीस करिता कोरोना योद्धा सिव्हिल संघ* विरूद्ध महावितरण संघ तर दुसरा सामना प्रथम व द्वितीय बक्षीस करिता व्यापारी महासंघ विरुद्ध हिंगोली पोलीस संघ यांच्यात होणार आहेत. संघांनी वेळेवर उप-स्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाकडून आयोजक शिवाजी मेटकर, सुनील पाठक यांच्याकडून करण्यात आले आहे.

# पुलवामा दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांना हिंगोलीत श्रध्दांजली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**

देशातील जम्मू काश्मीरच्या पुलवामा येथे १४ फ ब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या भारत मातेच्या वीरजवान सुपुत्रांना हिंगोली येथे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

जम्मू काश्मीर श्रीनगर हायवेवर दहशतवाद्यांनी विस्फोटक कारद्वारे सी आर पी एफ च्या जवानांच्या बसला धडक देवून दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला होता. त्यामुळे जवळपास ४० जवानांना वीरमरण आले. या भ्याड हल्ल्यात देशातील जवानांना सह महाराष्ट्रातील लोणार येथील नितीन राठोड, व मलकापूर येथील संजय राजपूत ही शहीद झाले होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार डॉ विजय निलावार, सामाजिक कार्यकर्ते गणेश साहू, भाजपचे बाबा घुगे, शाम खंडेलवाल, सुभाष नायक, मोतीराम घोडेकर नंदकुमार लव्हाळे, अजय भट्ट, सुभाष दराडे, राजू बांगर, चंदू शिखरे, शेख शाहबाज, सुनील काळे, प्रकाश नीनाळ आदींची उपस्थिती होती.

# शिवाजी महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**

श्री शिवाजी शिक्षण प्रस-ारक मंडळ हिंगोली संचलित शिवाजी महाविद्यालय कोथळज रोड हिंगोली येथे संत सेवालाल महाराजांची जयंती उत्साहात संपन्न झाली.

या समारंभास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून कार्यालयीन अधीक्षक श्री उत्तमराव जाधव यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी जाधव यांनी संत सेव-ालाल यांचय जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. डॉ.संदीप लोंढे, डॉ.गुणाजी नलगे, डॉ. एन. आर. हुरगुळे, कनिष्ठ म हाविद्यालय शिक्षक पर्यवेक्षक प्रा. देवानंद येवले, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. प्रकाश पिंजन, प्रा. धाराशिवशिराळे,प्रा.प्रकाश पतंगे,डॉ.सौ. संगीता मुंडे, डॉ. सौ. सुनंदा भुसारे, डॉ.सौ. मनीषा गवळी, प्रा. सौ. प्रियंका पवार, प्रा. सौ. नीलम काळे, प्रा. संजय चव्हाण, प्रा. तुकाराम चौतमल, प्रा. बळीराम शिंदे, प्रा. माणकेश्वर गलांडे, डॉ. सुनील कांबळे, डॉ. किशोर इंगोले, ग्रंथपाल डॉ. गणपत पवार, प्रा. दीक्षित इंगोले, श्री विजय पवार, प्रा. कैलास खंदारे, डॉ. बाप्पा जाधव, डॉ. शेरकर, डॉ. रामदास मुक्ते, डॉ. श्रीराम कराळे यांच्यासह समस्त प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.